भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क



पुणे वर्ष ९ वे अंक १ ला ● एप्रिल - जून २०१४ ● किंमत रु. २०/-(वार्षिक वर्गणी १००/-)

## स्वातंत्र्य संग्रामातील रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे जन्मस्थळ (वाराणसी)




संपर्कात राहुया ! संपर्क वाढवूया!!

palladio

Wakad - Tathawade

2 BHK | 1020 sft.
2.5 BHK | 1265 sft.

Eco-Friendly, Pro-Fitness,
Premium Terrace Homes





VJ | VILAS JAVDEKAR DEVELOPERS

www.javdekars.com | 96734 74949





शिवालय

Kothrud

2 BHK | 1100 sft.
3 BHK | 1450 sft.

Well Designed, Spacious
Luxury Terrace Homes

# संपर्क

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
ॐ
स्थापना १९८१

**संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!**



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

**वर्ष ९ वे** **एप्रिल-जून २०१४** **अंक १ वा**



**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर**
**मो.नं ९३२६८२६८८४**

**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर**
**मो.नं ९८५०९७९७०६**

**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी**
**मो.नं ९४४९०५१६५३**

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**

**श्री. गणेश गुर्जर**
९८९०९९०११३

**श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे, ९९७०१७४८१८

**श्री. मकरंद फणसळकर**
पुणे, ९८२२६१७३२४

**शहर प्रतिनिधी :**

श्री. दिलीप धोपेधरकर, मुंबई, ९८२०५२१०९८
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, ९७६९३२९९९३
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२-२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५



**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - गणेश गुर्जर**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदरांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/- (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**- गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/- | १५००/- |
| अर्धा | ८००/- | ३०००/- |
| पूर्ण | १६००/- | ६०००/- |
| शुभेच्छा | २५०/- | १०००/- |
| पुर्ण पान रंगीत | २५००/- | १००००/- |


**नियतकालिकाचे नाव** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे - ४११ ०३०
**संपादक** : श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.

संपर्क

## अनुक्रम

| | |
|---|---|
| ४ | बकुळफुले - सावली |
| ५ | विज्ञान वार्ता |
| ७ | पाककृती, पत्रप्रतिसाद |
| ८ | दुःखद निधन |
| ९ | 'सीएस' फाउंडेशनची परीक्षा 'क्रॅक' करताना |
| ९ | मिनी मॅरेथॉन जिंकताना – विश्वनाथ आठल्ये |
| ११ | आर्याकार कवी मोरोपंत |
| १२ | कृषी पंडित दानशूर शेंबेकर |
| १८ | मध्यमवर्गीयांचे नायक - व. पु. काळे |
| २० | महत्त्व दिवसांचे |
| २२ | वधु-वरांचे पान |
| २४ | कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुलुंड, तिळगुळ समारंभ |
| २५ | रत्नागिरी येथील कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा पुरस्कार वितरण समारंभ |
| २६ | आमची 'ओंकार रिसॉर्ट मुरबाडची सहल |
| २७ | कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे, कार्यक्रम वृत्तांत |
| २९ | आमची अंदमान सहल नव्हे, ही तर क्रांतीधामची यात्रा |
| ३० | महासंघाची अर्धवार्षिक सभा संपन्न : |
| ३१ | कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली (जि. ठाणे) संक्रांत संमेलन संपन्न |
| ३२ | 'स्त्रीभ्रूणहत्या' एक सामाजिक आव्हान |

सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

संपर्क



# संपादकीय

''संपर्क''च्या सर्व सभासदांना आणि महासंघाच्या सर्व सभासद संघाना आणि कार्यकारिणी सदस्यांना हिन्दू नववर्ष दिन म्हणजेच ''गुढीपाडवा''निमित्त हार्दिक शुभेच्छा. नवीन वर्षात नवीन संकल्प, नवीन कार्य हाती घेऊन ते यशस्वीरित्या पार पाडणे ही अपेक्षा आपण मनांत ठेवून कामास लागतो म्हणूनच सर्वांना शुभेच्छा.

महासंघाची सभा मुंबई येथे २३ फेब्रु. २०१४ रोजी झाली, त्यावेळी विषयानुसार चर्चा करतेवेळी ''संपर्क'' मध्ये विविधता असावी. अंक वाचनीय असावा अशा सूचना आल्या. संपादक मंडळाने यापूर्वी शहर प्रतिनिधींशी पत्राद्वारे चर्चा करतांना नवीन विषय घेण्याचे सूतोवाच केले होते. नाविन्यपूर्ण अंक यापुढे सभासदांना देण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही करत होतो, करणार आहोत व करीत राहू अशी ग्वाही देतो.

असो या अंकापासून नवीन विषय म्हणजे विज्ञान वार्ता, व्यक्ती विशेष, सभासदांच्या प्रतिक्रिया, वधुवर माहिती, पाककृती, कविता विनोद वर्णने चारोळ्या अशा विविधांगांनी सादर करीत आहोत. सभासदांच्या प्रतिक्रिया ह्या पोस्टकार्डावर आल्या तर त्या जशाच्या तशा स्कॅन करून समाविष्ट करणार आहोत. आपला प्रतिसाद अपेक्षित आहे.

वार्षिक सभेमध्ये जेव्हा संपर्कबाबत चर्चा सुरू होती, त्यावेळी आपल्या महासंघाचा व संपर्कचा स्थापना दिन महासंघाच्या सर्व सभासद संघानी साजरा करावा असे ठरले. महासंघाची स्थापना ही ११ एप्रिल १९८२ रोजी झाली. तर संपर्कचा पहिला अंक हस्त लिखित स्वरूपांत १ एप्रिल २००६ रोजी निघाला त्यानंतर नशिक संघाने एक अंक छापला व नंतर ''संपर्क'' सर्व जबाबदारी डोंबिवली संघाने स्विकारली. हे दोन्ही दिवस आपण आपल्या संघामध्ये वर्धापन दिन म्हणून साजरे करावे असे आग्रहाचे प्रतिपादन आहे.

थोडे विषयानंतर पण ते करणे आवश्यक आहे. देशभरांत आता लोकसभेची निवडणूक धुळवड सुरू झाली आहे. लोकसभा २०१४ ही सर्वार्थाने महत्त्वाची ठरणार आहे. कारण युवाशक्तीने आता यामध्ये रस घेतला आहे. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे आणि आपण ते पूर्ण पाळलेच पाहिजे. आयोगाने जर योग्य उमेदवार नसेल तर नकाराधिकार वापरण्याचा अधिकार दिला आहे. सर्व कऱ्हाडे ज्ञानीबांधवांना अतिशय आग्रहाची आणि नम्र विनंती आपला माताधिकार वापरा आणि जो आपणास योग्य उमेदवार वाटतो त्यास मतदान करा जर तसा उमेदवार नसेल तर नकाराधिकार वापरा पण देश हितासाठी आणि लोकसभा २०१४ या निर्णायक निवडणुकीस सामोरे जा.

– धन्यवाद

**संपादक**

# ‘बकुळफुले’

**डॉ. श्रीकृष्ण जोशी**

# सावली



स्वत:च्या सावलीचं मोजमाप घेणाऱ्या माणसाची ही कथा आहे. तो चक्रावून गेला होता. कारण सकाळी सावलीचं माप घ्यावं तर मोठी वाटायची. सायंकाळचं माप घ्यावं तर ती मोठी वाटायची. पण भर दुपारी तीच सावली खूप खुजी वाटायची. त्याला कळत नव्हतं काय करायचं ते. सूर्य पाठीमागं असला की सावली पुढं पडायची. सूर्य पुढं असला की सावली मागं दिसायची आणि डोक्यावर सूर्य आला की सावली पायातच घुटमळायची. चक्रावून जायचं आणखी एक कारण होतं. तो स्वत: मोजमाप घ्यायला वाकला की सावली सुद्धा वाकायची. त्यामुळे त्याला सावलीचा अंदाजच येत नव्हता. वा माणूस पुढे कायमचा गोंधळून गेला होता.

या गोष्टीचं तात्पर्य बाजुला ठेवायला हवं. कारण तात्पर्य काढण्यासाठी ही गोष्ट नाही. पण माणसाच्या प्रवृत्तीचा वेध घेण्यासाठी ही गोष्ट उपयुक्त आहे. जिथं जिथं म्हणून प्रकाश आहे, त्याच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला सावली आहे. अगदी पारदर्शक असलेल्या वस्तूची सुद्धा अस्पष्ट का होईना सावली पडतेच. शोधक नजरेनं ती पहावी लागते इतकंच. याचाच अर्थ प्रकाशाच्या सानिध्यात येणाऱ्यानं सावली नाकारून चालत नाही आणि नाकारायचं म्हटलं तर ती टाळता येत नाही.

सावली! तीन अक्षरांचा शब्द. तो शब्दही असा की गारवा घेऊन येतो. शब्दाच्या उच्चारानं सुद्धा मनात भास निर्माण होतो. मायेची सावली, पंखांची सावली, झाडाची सावली आणि एखाद्याच्या कृपेची सुद्धा सावलीच. एखाद्या शब्दाला किती अर्थ लगडलेले असतात. मायेच्या, पंखांच्या सावलीला नात्यांचे बंध अभिप्रेत असतात. झाडाच्या सावलीला निसर्गाच अकृत्रीम देणं म्हणता येतं आणि कृपेच्या सावलीला श्रद्धा, अध्यात्म, कृतज्ञता अशा भावनिक बंधांनी बांधलेले असतं. माणसाचं सगळं आयुष्य अशा विविध प्रकारच्या सावलीमुळं सुखकारक होतं असतं. समृद्ध होत असत. संपन्न होत असतं.

आपल्या गोष्टीतल्या माणसाला गोंधळून जायला होत होतं. कारण त्याला केवळ मोजमापं घ्यायची होती. लांबी रुंदीसारख्या तांत्रिक गोष्टीतच त्याला रस होता. सावलीची खोली, तिची घनता याकडे बघावं असं त्याला वाटत नव्हतं. प्रकाशातली सावली शोधणं इतकंच त्याच्या आयुष्याचं इतिकर्तव्य होतं.

वास्तविक सावली ही गोष्ट उथळपणानं घ्यायची नसते. हे अनेकांच्या गावीही नसतं. उन्हानं हैराण झालेला सावलीचा आधार शोधतो. संकटात, समस्या उद्‌भवल्यावर, त्याला कुणाच्या तरी आधाराची गरज लागते. मग तो आई वडील, मित्र अशांच्या सावलीचा विचार करतो.

वस्तुत: सकाळ, दुपार, सायंकाळ, या तीनही वेळी सावलीची रुप वेगळी असतात. ती माणसाच्या आयुष्याशी निगडीत असतात. बालपण, तारुण्य आणि वार्धक्य या तीन अवस्था दिवसातल्या तीन कालखंडासारख्या असतात. आणि त्या आपल्याला काही सुचवित असतात.

बालपणी आपल्याला दुसऱ्यांच्या सावलीची गरज असते. कुणाच्या तरी सावलीत आपण वाढत असतो. कुटुंब, समाज, शाळा यासारख्या ठिकाणी आपण बालपणी त्या त्या स्वरुपातल्या सावलीत वाढत असतो. तारुण्यात अंगी रग असते. कर्तृत्व बहराला येत असतं. आपली सावली आपल्या पायाशी घेऊन जिद्दीनं उभे रहात असतो आणि आपल्या अस्तित्वाची ठळक मोहोर उमटवित असतो. काळ बदलतो. तारुण्य संपतं आणि मग आपल्यापुढं पडणारी सावली आपल्यासाठी नसून ती दुसऱ्यांसाठी आहे याची जाणीव होऊ लागते. एका अर्थानं बालपणी आपल्याला मिळालेल्या सावलीचं आपण देणं लागत असतो. ते देणं तारुण्य संपल्यानंतर सावलीतून आपण फेडत असतो. नव्हे, आपण फेडायचंच असतं ही जाणीव महत्त्वाची असते. सावलीचे, आपल्या आयुष्यातील हे अर्थ, जेव्हा माणसाला जाणवू लागतात तेव्हा सार्थकता कशात आहे हे समजु लागतं.

आपल्या सावलीचा कुणाला तरी उपयोग होतो हे कळणंसुद्धा एक सुखद जाणीव आहे. कारण मग त्यातून परावलंबीत्व, म्हातारपण, निराशा, निरुत्साह, कंटाळवाणं आयुष्य हे शब्दच मुळी पळून जातात. आपली सावली समृद्ध आहे. लोकोपयोगी आहे आणि मुळात ती मायेच्या घनतेनं भरलेली आहे या जाणिवेनं आपण जस सुखावतो, तसं आपण इतरांनाही हवेहवेसे वाटत असतो. हे कळायला लागतं आणि मग सावलीच्या लांबी रुंदीपेक्षा, सावलीची खोली आणि घनता जास्त महत्त्वाची हे पटायला लागतं.

गोष्टीतल्या माणसाला हे आपणच पटवून द्यायला हवं.

**आपल्या सावलीचा कुणाला तरी उपयोग होतो हे कळणंसुद्धा एक सुखद जाणीव आहे. कारण मग त्यातून परावलंबीत्व, म्हातारपण, निराशा, निरुत्साह, कंटाळवाणं आयुष्य हे शब्दच मुळी पळून जातात. आपली सावली समृद्ध आहे. लोकोपयोगी आहे आणि मुळात ती मायेच्या घनतेनं भरलेली आहे या जाणिवेनं आपण जस सुखावतो, तसं आपण इतरांनाही हवेहवेसे वाटत असतो. हे कळायला लागतं आणि मग सावलीच्या लांबी रुंदीपेक्षा, सावलीची खोली आणि घनता जास्त महत्त्वाची हे पटायला लागतं.**

 ज्ञानाशिवाय मनुष्य आंधळा आहे, कलेशिवाय जीवन निरस आहे.

# विज्ञान वार्ता

सध्या प्रदूषण हा विषय बराच चर्चेत आहे. ध्वनी प्रदूषण, वायु प्रदुषण, पाणी प्रदूषण परंतु याबाबत कुणालाच काही घेणे देणे नाही. अशी प्रत्येकाच्या वागण्यावरून प्रचिती येते परंतु कांही शास्त्रज्ञ, विज्ञान प्रेमी यावर गंभीरपणे विचार करून, प्रयोग करून ते कसे कमी होईल याचे प्रयोग करत असतात. या विज्ञान वार्तामध्ये सर्वप्रथम आपण सांडपाणी या विषयावर प्रभुत्व मिळवलेले डॉ. प्रमोद मोघे यांची निरीक्षणे सादर करत आहोत. अत्यंत साध्या सोप्या भाषेत सांडपाणी या भस्मासुराशी कसे लढावे याबाबत दिलेल्या सूचना महत्त्वाच्या आहेत आणि सहजपणे अंमलात आणता येणाऱ्या आहेत. या सदरातून आपण या अंकात हा विषय मांडत आहोत आणि सर्व नागरिकांनी याची गंभीरपणे दखल घ्यावी अशी विनंती करत आहोत.

डॉ. प्रमोद मोघे हे संशोधन क्षेत्रातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोग शाळेत वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते आणि त्यांनी अनेक विषयांवर तेथे संशोधन केले. त्यांच्यासह अनेक भारतीय शास्त्रज्ञांनी जन्भर राबून प्रसिद्ध केलेले. संशोधन ०.१ टक्के सामान्यच काय, विज्ञान क्षेत्रामध्ये उच्च शिक्षित अध्यापक आणि विद्यार्थी वर्गापर्यंत पोहोचू शकले नाही, ही खंत त्यांच्या मनांत आहे. सांडपाणी या विषयावर त्यांचे, ''युद्ध सांडपाणी नावाच्या भस्मासुराशी'' या पुस्तकातील आपणच सांडपाणी कसे तयार करतो याची माहिती क्रमश: देत आहोत.

''सांडपाणी म्हणजे सर्वसाधारणपणे घरगुती व्यापार व घरगुती उद्योगातून निर्माण झालेला द्रव कचरा.'' केंद्रीय प्रदूषण मंडळाने दिलेल्या २००९ च्या अहवालानुसार भारतातील १० लाखाच्या वर लोकसंख्या असलेल्या क्लास १ आणि १ लाख संख्या असलेल्या क्लास २ अशा शहरातून प्रति दिनी ३८२५४ लाख लिटर सांडपाणी निर्माण होते. पैकी फक्त ११७८७ लाख लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उरलेले सगळे म्हणजे २६४६७ लाख लिटर सांडपाणी प्रक्रियेविना दररोज नदीत/समुद्रांत/जमिनीवर सोडले जाते.

आता आपण हे सांडपाणी कसे तयार होते हे पाहू आपल्या दैनंदिन जीवनांत साधारणपणे प्रत्येक व्यक्ती १७ ते २० ग्रॅम रसायने सांडपाण्यांत आपल्या बाजूने सोडत असतो, परंतु आपणांस त्याची कल्पना नसते, आपला दैनंदिन दिनक्रम बघितला, अगदी बारकाईने बघितला तर या रासायनिक अतिक्रमणास आपणच कमी करण्याचा प्रयत्न करू शकू. आपल्याच सांडपाणी निर्माण करणाऱ्या कृती

१. दात घासणे –

आपण उठल्या उठल्या बेसिनकडे धाव घेतो. ब्रशवर २ ते ५ ग्रॅम पेस्ट घेतो दात घासून झाल्यावर बेसिनमध्ये तो पेस्टचा फेस थुंकतो व तोंड स्वच्छ धुतो. ही क्रिया झाली पण यापासून या पेस्टमध्ये असलेली मीठ, फॉस्फेट, कार्बोनेटस, सुगंधी द्रव्य, रंग डिटर्जन्टस् इ. ६ प्रकारची रसायने असतात. यातून केवढे सांडपाणी तयार होते. एका शहरात ४० लाख नागरीक असतील व पैकी अंदाजे ३० लाख पेस्ट वापरत असतील तर ३० लाख × ४ ग्रॅम पेस्ट – १२० लाख ग्रॅम रसायने रोज विसर्जित होतात. हे एका शहरातून म्हणजे अशी भारतातील किती शहरातून अशी रसायने पाण्यात विसर्जित होतात.



याचा अर्थ असा नव्हे की पेस्टने दात साफ करू नये त्यासाठी उपाय आहेत – ते खालीलप्रमाणे

१. वैज्ञानिक दृष्ट्या असे सिद्ध झाले आहे की फक्त ब्रशने दात घासल्यास ते पूर्ण स्वच्छ होतात व ते आरोग्यदायी आहे.

२. आयुर्वेदिक दंत मंजने, नीम, बाभूळ, यांच्या काड्या वापरून दात साफ करता येतील.

३. शास्त्रीय उपाय म्हणून १ ते ३% प्रमाणित हायड्रोजन पॅरॉक्साईडने दात साफ केल्यास दातातील कीड मरते आणि दात स्वच्छ होतात. पांढरे शुभ्र होतात. यामुळे सांडपाण्यांत त्याचे पाणी आणि ऑक्सिजनमध्ये विघटन होते.

बाजारांत हायड्रोजन पॅरॉक्साईड ८ ते १०% प्रमाणाचे मिळते. एकदम पेस्ट न वापरून लागलेली सवय बंद होणार नाही, त्यासाठी हळूहळू प्रयत्न करावा म्हणजे १/२ ग्रॅम पेस्ट वापरून बघावी व नंतर बंद करून वरील उपचाराने दात स्वच्छ केल्यास सांडपाण्यामध्ये होणारे प्रदूषण आपण आपल्या परीने कमी करू. फक्त इच्छाशक्तीची अत्यंत आवश्यकता आहे.

२. दाढी करणे –

महानगरांत जर पुरुषांची संख्या २० लाख धरली, तर १५ लाख पुरुष रोज दाढीसाठी जेल, क्रीम, पेस्ट व साबण याचा वापर करतात. या प्रसाधनांत फेसयुक्त रसायने, सल्फेटस्, कार्बोनेटस्, स्टेअरिक ॲसिड, इथेनॉल अमिन इ. ८ ते १० रसायने वापरण्यांत येतात. दाढीच्या ब्रशवर असे प्रसाधन ५ ते ८ ग्रॅम वापरले जाते याचाच अर्थ असा की दररोज ५ ग्रॅम × १५ लाख = ७५ लाख ग्रॅम दाढी रसायन



**(कृपया पान क्र. ८ )पहा**


पाणी शरीर स्वच्छ करते तर तीर्थ मनाला स्वच्छ करते.

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**

**THE DESIGN STUDIO**

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे

**दूरध्वनी : ०२५१–२४५२०५२**

**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# पाककृती

– डॉ. मेधा पटवर्धन
आहारतज्ज्ञ

## सफरचंदाचे सूप

साहित्य –

१. दोन सफरचंदे
२. एक तुकडा दालचिनी
३. दोन–तीन लवंगा
४. आल्याचा लहान तुकडा
५. पाणी ५–६ कप
६. मीठ, साखर चवीनुसार



कृती – सफरचंदे सालासकट बारिक चिरा ५–६ कप पाण्यामध्ये बारिक चिरलेली सफरचंदे, लवंगा, दालचिनी घालून शिजवून घ्या. शिजवलेले मिश्रण मिक्सरमध्ये ब्लेड करून ते गाळून घ्या.

चवीनुसार मीठ व साखर घालून उकळून घ्या व गरम सर्व्ह करा. उष्मांक ४० एका वाटपामध्ये.

## काकडी पुदिना सूप



साहित्य – २–३ काकड्या साल काढून बारीक चिरावी, १०–१५ पुदिन्याची पाने, बारीक चिरलेला १ कांदा, ५–६ लसूण पाकळ्यांची पेस्ट, २ टीस्पून मैदा, ३–४ कप पाणी, १ वाटी ताजे दही, मीठ मिरेपूड स्वादानुसार.

कृती – प्रथम कांदा लसूण लोण्यावर परतून घ्यावे त्यावर चिरलेली काकडी व चिरलेली पुदिन्याची पाने घालून पुन्हा परतावे. नंतर पाणी घालून मिश्रणांत मैदा हळूहळू मिसळावा. पातेल्यावर झाकण ठेवावे. सूप दाट झाल्यावर गॅस बंद करावा. सूप गार झाले की, मिक्सरमधून ब्लेंड करतांना त्यामध्ये ताजे दही, मीठ, मिरपूड घालावी आणि बाऊलमधून सर्व्ह करावे. हे सूप गरम अथवा गार घेता येते.

एका बाऊलमधील या सूपचा उष्मांक ८० आहे.

# पत्र प्रतिसाद

दि. २० ऑक्टो. २०१३

अरविंद ग. भाटवडेकर
अ/१३, कार्निका सोसायटी
डॉ. राधाकृष्णन क्रॉस रोड
अंधेरी (पूर्व)
मुंबई – ४०००६९

'संपर्क'ची अशीच प्रगती होवो.


स.न.वि.वि.

संपर्क त्रैमासिकाचा ऑक्टोबर – डिसेंबर २०१३ हा अंक मिळाला. अंक ~~[illegible]~~ नवीन/रंगीत रूपात पाहून आनंद झाला. कार्याचे दमदार पुढील रूपांतर होते; अशीच प्रगती संपर्क करीत आहे. धन्यवाद.

माननीय श्री. अवधूत हर्डीकर व श्री. श्रीपाद लग्रे, मान्यवर कऱ्हाडे ब्राह्मणांचा परिचय करून देत आहेत. यांत खंड न पडतां, सातत्याने असे लिखाण प्रसिद्ध होणे गरजेचे आहे. यातूनच आज/उद्यां नवकोरा संदर्भग्रंथ निर्माण होईल. भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने, विभागीय संघांचे मदतीने असे कार्य अवश्य हाती घ्यावे. त्याला चांगलाच प्रतिसाद मिळेल.

अरविंद ग. भाटवडेकर

# ज्येष्ठ गीतकार सुधीर मोघे यांचे दु:खद निधन



ग. दि. माडगुळकर आणि शांता शेळके या थोर कवींच्या परंपरा जपणारे कवी श्री. सुधीर मोघे यांचे शनिवार दि. १५ मार्च २०१४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. वयाच्या ७५ वर्षांमध्ये अनेक क्षेत्रांत ज्यांनी आपला ठसा उमटवला अशी ख्याती असलेले ते मनस्वी कवी, संगीतकार संवाद लेखक, पटकथा लेखक आणि चित्रकारही होते.

कै. सुधीर मोघे यांच्या खूप कविता गाजल्या त्यापैकी 'फिटे अंधाराचे जाळे', 'सांज ये गोकुळी', 'दिसे जातील दिसत येतील', 'एकाच या जन्मी जणू', 'रंगूनी या रंगात साऱ्या', 'सखी मंद झाल्या तारका', 'दिसलीस तू फुलले ऋतू' यामुळे ते प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचले. निर्मिती संकलन दिग्दर्शनमध्ये 'नक्षत्रांचे देणे', मंतरलेल्या चैत्रबनात' आदी कार्यक्रम अजूनही रसिक विसरू शकलेले नाहीत.अशा या महान कविला उत्तुंग व्यक्तीमत्वाला 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो!

## सुधीर मोघेंची गाजलेली गाणी

### दिसलीस तू फुलले ऋतू

दिसलीस तू फुलले ऋतू
उजळीत आशा हसलीस तू
उरले ना आसू विरल्या व्यथाही
सुख होऊनीया आलीस तू
जाळीत होते मज चांदणे जे
ते अमृताचे केलेस तू
मौनातुनी ये गाणे दिवाणे
त्याचा अनामी स्वरभास तू
जन्मात लाभे क्षण एकदा हा
ते भाग्य माझे झालेस तू

**गीत – सुधीर मोघे**
**संगीत – राम फाटक**
**स्वर – सुधीर फडके**

### फिटे अंधाराचे जाळे

फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश,
दरी–खोऱ्यातून वाहे, एक प्रकाश प्रकाश
रान जागे झाले सारे, पायवाटा जाग्या झाल्या
सूर्य जन्मता डोंगरी, संगे जागल्या सावल्या
एक अनोखे लावण्य आले भरास भरास
देव पिऊनी नवेली झाली गवताची पाती
गाणी जुनीच नव्याने आली पाखरांच्या ओठी
क्षणापूर्वीचे पालटे जग उदास उदास
झाला आजचा प्रकाश जुना कालचा काळोख
चांदण्याला किरणांचा सोनसळी अभिषेक
सारे रोजचे तरीही नवा सुवास सुवास
साऱ्या रंगावर आली एक सोनेरीशी झाक
भिडे काळजाला थेट निळ्या क्षितिजाची हाक
तुझ्या नसण्याची कळ गेली तळास तळास

**गीत – सुधीर मोघे**
**संगीत – श्रीधर फडके**
**स्वर – सुधीर फडके, आशा भोसले**

---

## सौ. दिपश्री जोशी आणि श्री दिपक जोशी यांचे अपघाती दु:खद निधन

कऱ्हाडे ब्राह्मण संघ कोल्हापूरच्या कार्यकारिणी सदस्या सौ. दिपश्री जोशी आणि श्री दिपक जोशी यांचे अपघातामध्ये दि. २/११/१३ दु:खद निधन झाले. सौ. जोशी यांनी कोल्हापूरच्या संघासाठी भरपूर कार्य केले आहे. त्यांच्या निधनाने कऱ्हाडे ब्राह्मण संघ कोल्हापूरचे नुकसान झाले आहे. भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ कार्यकारिणी आणि तिचे सर्व सहयोगी संघ श्री. जोशी आणि सौ. दिपश्री जोशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करीत आहे.

ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो!

---

**पान क्र. ५ वरून**

## विज्ञान वार्ता

आपण सांडपाण्यांत विसर्जित करतो हे एका शहारातील तर भारतातील अन्य शहरांतही होणारे हे पाणी प्रदूषण भयंकर आहे. म्हणजेच आपण याबाबत काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

याचा अर्थ असा नव्हे की प्रसाधनाने दाढी करूच नये. यावर खालील उपाय आहेत.

१. जर आपण स्नान केल्यावर अथवा चेहरा गरम पाण्याने धुतला तर चेहऱ्यावरील केस मऊ होतात. जर आधुनिक पद्धतीच्या ब्लेडने दाढी केली तर ती साबणाशिवाय ही होऊ शकते.

२. साबण, क्रीम, पेस्ट ऐवजी जर कोरपडीचा गर काढून तो चेहऱ्यास लावून दाढी केली तर ती उत्तम होते.

३. साबण, पेस्ट, क्रीम ऐवजी जर लोण्याचा हात लावून चेहरा मऊ केला तरी सुद्धा दाढी होते.

४. अगदी सवय होईपर्यंत १ ग्रॅम दाढीचे प्रसाधन काही दिवस वापरले की मग वरील उपाय करून या सांडपाण्यातील प्रदूषणांस थोपवू शकतो.

हा दैनंदिन जीवनातील पुरुषांच्या सवयीतून होणाऱ्या प्रदूषणाचा विषय. पुढील अंकांत आपण भांडी घासणे, कपडे धुणे आणि सौंदर्य प्रसाधनांमधून सांडपाण्यात होणारे प्रदूषणाबद्दल माहिती घेऊ.

– डॉ. प्रमोद मोघे, पुणे
– ९३२५३८००९३



काम, क्रोध आपसात लढवून मारणे यातच ज्ञानाचे कौशल्य आहे.

# कु. अबोली पित्रे - हार्दिक अभिनंदन!!!

# 'सीएस' फाउंडेशनची परीक्षा 'क्रॅक' करताना - अबोली पित्रे

द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडियातर्फे (आयसीएसआय) घेण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यावरील परीक्षेत पुण्याची अबोली गोविंद पित्रे प्रथम आली. नियमित अभ्यास आणि संकल्पना समजून घेण्यावर दिलेला भर यामुळे हे यश मिळवणे शक्य झाल्याचे अबोली सांगते. तिने केलेली तयारी आणि नियोजन सध्या 'सीएस'ची तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी नक्कीच मार्गदर्शक ठरेल. तिने तिचा हा अभ्यासाचा 'प्लॅन' 'फ्युचर नाउ' बरोबर शेअर केला. तो तिच्याच शब्दांत येथे देत आहोत.



**नियमित अभ्यास**

मला दहावीत ९३.६४ टक्के, तर बारावीत ९०.३३ टक्के मार्कस् होते. दोन्ही वेळी नियमित अभ्यास हीच यशस्वी गुरुकिल्ली होती. बारावीनंतर मी 'सीएस' करायचे ठरवले होते. त्यानुसार बारावीची परीक्षा संपल्यावर मे महिन्यातच मी सीएस फाउंडेशन प्रोग्रामच्या परीक्षेचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. सुधीर कुलकर्णी यांच्या क्लासमध्ये मी या परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन घेत होते. परीक्षेला चार विषय असतात. या चारही विषयांचा मी नियोजन करून रोज दोन ते तीन तास अभ्यास करीत होते. क्लासच्या वेळेव्यतिरिक्त हा अभ्यास होत असल्याने चांगली तयारी झाली.

**संकल्पना समजून घेतल्या**

सीएस फाउंडेशन परीक्षेसाठी चार विषय असतात. त्यातील बिझनेस मॅनेजमेंत, एथिक्स अँड कम्युनिकेशन आणि बिझनेस एर्न्व्हायर्नमेंट, बिझनेस लॉ अँड ऑत्रप्रेन्युअरशिप हे दोन्ही विषय तपशिलाने अभ्यासावे लागतात. त्यासाठी 'आयसीएसआय'च्या मॉड्युल्सचा मी सखोल अभ्यास केला. ती मॉडयूल्स मी बारकाईने वाचून काढली. इकनॉमिक्समध्ये संकल्पना स्पष्ट होणे महत्त्वाचे असते, तर अकौंटस्‌साठी सातत्याने सराव करणे महत्त्वाचे असल्याने त्यावर भर दिला.

**माझी आवड**

माझा अभ्यास चांगला झाला; कारण मुळात मला कॉमर्स ही विद्याशाखा आणि त्यातून कंपनी सेक्रेटरी हे क्षेत्र आवडते. कंपनी सेक्रेटरीला विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामध्ये मनुष्यबळ व्यवस्थापनापासून ऑडिटिंगच्या कौशल्यांची कसोटी लागते. ही दोन्ही कौशल्ये आत्मसात करण्याची माझी इच्छा होती आणि त्या दिशेने माझे प्रयत्नही सुरू असल्यानेच मी सीएस करायचे ठरवले. अर्थात, सीएस करते म्हणून कॉलेजकडे दुर्लक्ष केले नाही. कॉलेजमधीलही विविध उपक्रमांत मी भाग घेते. सांस्कृतिक उपक्रमांत सूत्रसंचालन करणे, कॉलेजमधील सामाजिक उपक्रमांचे व्यवस्थापन या गोष्टी मी आवडीने करते. चित्रे रेखाटणे हा तर माझा आवडता छंद आहे. या एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हीटी तुमचे व्यक्तिमत्व खुलवायला उपयोगी पडतात, असे मला वाटते.

# मिनी मॅरेथॉन जिंकताना – विश्वनाथ आठल्ये

पुणे पोलिसांतर्फे दोन ते आठ जानेवारी २०१४ या कालावधीत 'रेझिंग डे' साजरा करण्यांत आला. या काळात पोलिसांचे कामकाज, वाहतुकीचे नियम, सुरक्षितता, नागरिकांनी घ्यावयाची दक्षता, इ. याची माहिती लोकांना व्हावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यांत आले होते.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून ५ जानेवारी २०१४ रोजी 'रन फॉर सेफर पुणे' या 'मिनी मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली ज्येष्ठ नागरिकांसाठी ५ किलोमीटर पळण्याची होती. या रॅलीसाठी वयोगटानुसार विविध गट तयार करण्यांत आले होते. (सिनियर सिटीझन) ज्येष्ठ नागरिक या गटात सुमारे ३०० ते ४०० व्यक्तिंचा सहभाग होता. या गटात मी ३ऱ्या क्रमांकाने विजयी झालो.



गोविंदा व अभिनेत्री महिमा चौधरी यांच्या हस्ते विश्वनाथ आठल्ये बक्षिस घेताना.

या रॅलीच्या उद्घाटनाला प्रसिद्ध अभिनेता गोविंदा व अभिनेत्री महिमा चौधरी उपस्थित होते. त्यांच्याच हस्ते (आम्हांला) मला विजयी कप देण्यांत आला. या शिवाय श्री. गुलाबराव पोळ पुणे पोलिस आयुक्त (कमिशनर ऑफ पुलिस) यांच्या हस्ते रु.१०००/- रोख व मानचिन्ह चे बक्षिस देण्यांत आले.


– विश्वनाथ गणेश आठल्ये
ब्लॉक नं. १, दत्तप्रसाद सहकारी गृहसंस्था
५८७/६ सिंहगड रोड, पुणे – ४११ ०३०.
फो:०२०-२४३३०२४३/९३२६४४०१०४

 माता म्हणजे परमेश्वराचे रूप तेव्हा तिचा मान परमेश्वराप्रमाणेच ठेवा. 


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीा सर्व सोयींनी केटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

# आर्याकार कवी मोरोपंत

मयूरकवी, मयूरपंडित या नावाने सुपरिचीत मध्ययुगीन मराठी पंडिती काव्य परंपरेतील श्रेष्ठ कवी मोरोपंत उर्फ मयुर रामचंद्र पराडकर हे कऱ्हाडे ब्राह्मण, मूळ गांव कोकणांतील सौदळ. मोरोपंतांचा जन्म इ.स.१७२९ मध्ये झाला. मोरोपंताचे पणजोबा रामाजी पंत हे नोकरीच्या निमित्ताने पन्हाळगडावर आले व तेथेच स्थाईक झाले. मोरोपंतांचे वडील रामचंद्रपंत पराडकर आणि आई सौ. लक्ष्मीबाई यांचा हा पुत्र पन्हाळगडावर जन्मास आला. रामचंद्र पंत कोल्हापूरच्या छत्रपतींच्या पदरी नोकरीस होते व तेथेच मोरोपंतांचे बालपण गेले आणि विद्याभ्यासही झाला. पन्हाळगडावरील केशव पाध्ये व गणेश पाध्ये यांचेकडून मोरोपंतांनी न्याय, व्याकरण, धर्मशास्त्र, वेदान्त, व्याकरण साहित्य इ. अध्ययन केले आणि व्युत्पन्न पंडित झाले. वयाच्या २४ व्या वर्षापर्यंत मोरोपंत पन्हाळगडावरच होते. पुढे १७५२ च्या सुमारास रामचंद्र पंत बारामतीस गेले. तेथे ते बाबुजी नाईकांच्या आश्रयांनी अखेरपर्यंत राहिले. मोरोपंत कांही वर्षांनी वडिलांना भेटण्यासाठी म्हणून बारामतीस गेले ते कायमचेच. बारामतीकर झाले बारामती मध्येच बरेचसे काव्य/लेखन झाले.



मोरोपंत स्वभावाने सरळमार्गी होते. प्रेमख, मित भाषी व सौम्य प्रकृती ही त्यांची गुण वैशिष्ट्ये. आपल्या आयुष्यांत संसार करतांना लेखन वाचन, पुराण कथन यापलिकडे कोणत्याही व्यावहारीक भानगडीत ते पडले नाहीत. त्यांचे मनांत कोणाविषयी राग नसे त्यामुळे त्यांच्या सहवासांत येणाऱ्या मंडळींना त्यांचे बद्दल आदर असे. पंत नुसते सद्गृहस्थच नव्हे तर ते एक सतकवी आणि सत्पुरूष म्हणून त्यांच्या काळात आदरणीय मानले जात असत.

मोरोपंताच्या लेखनाबद्दल असे सांगितले जाते की, ते दररोज रात्री ते धुळपाटीवर ग्रंथ लिहून विश्रांतीसाठी जात असत. दुसरेदिवशी पाटीवरील ग्रंथ कागदावर (लिहून) नकलून घेण्याचे काम लक्ष्मण भट वाईकर हे करीत. एके दिवशी चाकराच्या हातून अशी ग्रंथ लिहिलेली धूळपाटी उधळली गेली, तेव्हा पुसला गेलेला ग्रंथ प्रभु रामचंद्राने स्वत: कागदावर लिहून काढला असे पंताच्या काळातच लोकांत बोलले जाई ही अख्यायिकाही पंत सत्पुरुष म्हणून लोकादरांस कसे पात्र झाले होते हे दाखवणारीच आहे.

मोरोपतांनी जे काव्य केले त्याच्या निर्मितीचे कालखंड ५ होते ते म्हणजे

१. सन १७५० ते १७६० हा प्रारंभीचा उमेदवारीचा काळ. या काळांत पंतांनी कुशलवोपाख्यान, 'कृष्णविजयचा पूर्वार्ध, प्रल्हाद विजय यासारखी काव्ये केली.

२. इ.स.१७६१ ते १७६६ या काळांत पतांनी प्रामुख्याने श्लोकबद्ध प्रौढ भरदार व पुष्ट अशी काव्यरचना केली. ''साररामायण'' ''कृष्णविजय''चा उत्तरार्ध आणि इतर अनेक श्लोकबद्ध प्रकरणे लिहिली.

३. इ.स.१७६६ ते इ.स.१७७२ परिपक्वतेच्या या कालखंडात ''सीतागीत'' ''मंत्र रामायण'' ''आर्यामुक्तमाला'' ''आर्यकेकावलि'' ''नाम महात्म्य'' ''संशयरत्नावलि'' ''भीष्म भक्ति भाग्य'' ''नारदभ्युदय'' इ. परमेश्वर स्तोत्र भागवती स्तोत्रे लिहिली. याच महत्त्वाच्या काळांत पतांनी आर्यावृत्तावरही प्रभुत्व संपादन केले आणि याच ''आर्यां''मुळे मोरोपंतांना प्रसिद्धीच्या शिखरावर नेऊन ठेवले.

४. इ.स.१७७३ ते इ.स.१७८२ – या दहा वर्षांच्या कालखंडामध्ये पंत काव्याचा मेरूमणी शोभणारे ''आर्या भारत'' लिहिले. या काळात पंतांनी काव्य निर्मित्तीची गुणदृष्ट्या सर्वोच्च ठरणारी काव्यनिर्मिती केली. यानंतर ते ''आर्यापती'' म्हणून ओळखले जाऊ लागले.

५. इ.स. १७८३ ते १९७४ या अखेरच्या कालखंडात ''मंत्र भागवत'', ''हरिवंश'', ''संकीर्ण रामायणे'' हे मोठे ग्रंथ, काही संतस्तवनपर प्रकरणे, देवाची स्त्रोत्रे ''श्लोक केकावलि'' हे काव्य लेखन केले.

या ४५ वर्षाच्या कालखंडामध्ये मोरोपतांनी ७५ लाखांच्यावर कविता लिहिल्या आहेत. त्यांच्या नावांवर २६८ काव्यकृतींची नोंद आहे.

बारामतीला मोरोपतांनी आपले आयुष्य व्यतीत केले आणि बारामतीकर यांना कसे विसणार? बारामतीमध्ये मोरोपंताचे स्मारक निर्माण करण्यात आले आहे. दरवर्षी बारामतीकर मोरोपंतांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कार्यक्रम करत असतात. बारमातीमध्ये कविवर्य मोरोपंत स्मारक समिती मोरोपंत निवास म्हणून प्रसिद्ध आहे. या समितीचे अध्यक्ष श्री माधव जोशी असून प्रमुख विश्वस्त श्री रविंद्र खांडेकर आहेत. मी माझे परमभाग्य समजतो की माझ्या सारख्या व्यक्तीला बारामतीला बोलावून माझी माहिती काढून मोरोपंतांचे पणतू म्हणून माझा सत्कार केला हे माझ्या जीवनाचे सार्थक झाले असे मी मानतो. मोरोपंत यांच्या ''आर्या''मधील वानर्गादाखल खाली देत आहे.

मोरोपंतांचे आराध्य दैवत प्रभु श्रीराम त्यांच्या चरित्राकडे ते उत्कटतेने वळलेले दिसते. त्यावरील आर्यातंत्रावर आधारीत कवने.

*रामाचे रचिले चरित्र मुनीने वाल्मिकीने संस्कृती।*
*नाही हानि कदापि अन्यकविही ते वर्णिता प्राकृती।।*
*मुक्तांचा हार पहिला जो रेशिमांच्या गुणे।*
*तो कार्यास गुणेकरुनि करिता काय प्रभेला उणे?।।*
*केले पात्र सुवर्णाचे, की विरुपारी खापरी।।*
*लाविता तेथे संहारी तम, दीप शिखापरी।।*
*वाल्मिकी विप्रोत्तम काव्यपद्म।*
*श्रीराम लीला मकरंद सदन।।*
*तेथे मयुरेश्वर भृंग जाला सेवावया नित्य सुखे रसाला।।*

मोरोपंतांचे निधन दि. १५.४.१७९४ रोजी बारामती येथे झाले. त्यांच्या स्मृतीस माझे विनंम्र अभिवादन


– **केशव पराडकर**
स्टेट बँक स्टाफ कॉलनी
सिंहगड रोड, पर्वती, पुणे ४११००९
फोन नं. – ०२०–२४३२१९७५



रोग ही भोगाची तर आरोग्य ही योगाची परिणती आहे.

# कृषी पंडित दानशूर शेंबेकर

शेंबेकरांचे सर्व कर्तृत्व बारामतीस कऱ्हा नदीच्या काठी फुलले.

दादांचा जन्म २५ एप्रिल १८८१., मृत्यू ३१ ऑगस्ट १९५५ हरीहर येथे

१९१३-१४ पासून त्यांनी शेती करण्यास प्रारंभ केला.

बारामतीस रंगूशेट गुजर नावाचे मोठे सावकार होते. त्यांनी दादांना 'मळद' येथील १० एकर जमीन, ५० रुपये खंडाने दिली. दादांचे घराणे दरिद्री. या हुषार विद्यार्थ्याला शिक्षण घेता आले नाही. गणित विषय चांगला. नाईलाजांनी म्युनिसिपल नाक्यावर दरमहा ५ रु. वर नोकरी केली. मग १५ रु. महिन्यावर पारक्त्याचीही नोकरी केली. पाटाचे पाणी ऊसाच्या शेतीला द्यायचे. शेतकरी पाण्याची चोरी करायचे आपल्या ऊसाच्या पिकाला पाणी द्यायचे. पाणी आळी-पाळीने द्यावे असा नियम होता. दादांनी चोरी थांबविली. मुख्य म्हणजे ऊसाच्या शेतीची माहिती चौकसपणे मिळविली.

खंडाने घेतलेल्या जमिनीत ते दिवसभर राबू लागले. परिणामी त्यांना ऊसाने २०० रुपये फायदा दिला. दादांनी पारंपारिक वाट सोडून स्वत:च्या ज्ञानाने नवीन आडसाली ऊस लावण्याची पद्धत रूढ केली. १९१९-२० या वर्षी आडसाली पद्धतीने १० एकर ऊस केला. त्यांना २३ हजार रुपये फायदा झाला. दादा अभ्यासू होते. मोठे शेतकरी होण्याचा व चौफेर कर्तृत्व करण्याची त्यांची महत्वाकांक्षी योजना होती.

१९२८ साली, भीमा नदीच्या काठी ३०० एकर पडीक जमीन फॉरेस्ट डिपार्टमेंट कडून १२ हजार रुपयाने विकतच घेतली. दादांनी येथे अपार कष्ट केले. नंदनवन केले. १९४४ साली जमीन विकली त्याचे पावणेतीन लाख रुपये मिळवले. दादा जोडधंद्याचे महत्व ओळखून होते. भाकड म्हशी घेत दुभत्या झाल्या म्हणजे त्यांचा भाव आहे. भरपूर फायदा मिळे. १९४३-४४ साली त्यांचेकडे १८३, म्हशी होत्या. दादांना किती फायदा झाला.



इम्पीरिअल कौन्सिल ऑफ सेंट्रल शुगर केन कमिटीचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. फायदा कसा होईल व पैसे कसे मिळतील याकडे त्यांचे लक्ष असायचे. त्यांना मोठे श्रीमंत शेतकरी व्हायचे होते. दारिद्याला त्यांनी रामराम ठोकला.

लष्कराला भाजीपाला पुरवला की त्याचे पैसे लगेच पदरी पडत. पुढे पाऊल पडतच राहिले. द्राक्षाच्या लागवडीचे नवे प्रयोग केले. बारामतीत ही नवलाईच होती. महाराष्ट्रात द्राक्षाची लागवड गाजली. त्यांना प्रसिद्धी मिळाली. चढाओढ लावली. शंकरराव दाते यांनी एकरला २०५ पल्ले द्राक्ष पीक काढून विक्रम केला. दादांनी त्यांना चांदीच्या ताटातून एक हजार कलदार रु. दिले. दातृत्व त्यांचे ठायी होते.

द्राक्षे पैसे देणारे पीक अशी प्रसिद्धी मिळाली. संत्री, मोसंबी, पपई, केळी यांचे भरमसाठ उत्पन्न मिळवले बघा. चार इयत्ता शिकलेले दादा. युरोप अमेरिकेला तेथील बागायती अभ्यासण्यासाठी गेले. निवडणूक त्यांनी शेतकरी म्हणूनच लढवली. शेतकऱ्यांचे कैवारी होते दादा. पुणे-विद्यापीठ, स्थापन होणार असे समजल्यावर त्यांनी एक लाख रुपये दिले ते मुंबईतील गर्व्हनर ने स्वीकारले पुढे विद्यापीठ निघाल्यावर त्याला दिले.

एकूण ३ लाखापर्यंत त्याच्या देणग्या आहेत. कुठे तो बालपणीचा ५ रुपयावर नोकरी करणारा गणू आणि ३ लाखावर देणगी देणारे रा. व. शेम्बेकर. मालेगाव येथील साखर कारखान्याच्या स्थापनेत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कऱ्हाडे ब्राह्मण शेतकऱ्याचा आम्हाला अभिमान आहे. आज ब्राह्मण शेतकरी नसतोच. दुसरा दानशूर असेलच असे नाही. कऱ्हाडे ब्राह्मण शेंबेकर यांना मानाचा मुजरा!

दादांचा नातू - अनंत करकरे
नीलसिद्धी टॉवर्स बी -११२ वाशी
फोन ३२९८९६०५

## ओपन सिक्रेट

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी एका सैनिकानं आपल्या मित्राला पत्र लिहिलं. त्यात त्यानं सांगितलं. 'तुला हे पत्र पोहोचेल की नाही मला माहीत नाही. कारण पत्रं सेन्सॉर होतात. ते ती उघडून पहातात. नंतर एक आठवड्यात त्या सैनिकाला पोस्टाकडून एक चिठ्ठी मिळाली. तुमचं पत्रातलं स्टेटमेंट चुकीचं आहे. आम्ही पत्रं उघडीत नाही.

## प्रॉब्लेम

प्रसिद्ध मनोविकारतज्ञ डॉ. प्रधान यांच्याकडे बंडू सरंजामे गेला आणि त्यांना म्हणाला, 'डॉक्टर माझ्या सगळ्या इच्छा मेल्यात - या धावपळीच्या आणि गोंधळलेल्या स्थितीत काय करावं काही समजत नाही.

'खरं आहे, आपल्या सगळ्यांनाच आपले problems आहेत. आठवड्याला ५०० रुपयांची अशी दीड दोन वर्षे ट्रीटमेंट तुम्हाला घ्यावी लागेल. 'हो, त्यामुळे तुमचा problem सुटेल, माझं काय?'



व्यायाम आरोग्याचे तर आरोग्य सुखाचे मूलतत्व होय.


शुभं करोति कल्याणम्
आरोग्यं धनसंपदा।
शत्रुबुद्धिविनाशाय
दीपज्योतिर्नमोस्तुते।।
100% NATURAL
100% Pure
Pitambari
Agro Division
2X MORE
SaptaShakti
Til Oil
With the power of '7' Ayurvedic entities
विशुद्ध स्वरूपात
आणि दर्जेदार
सप्तशक्ती
तीळ तेल
काजळी धरत नाही.
सात्विक शांती लाभते.
कमी लागते, जास्त वेळ जळते.
★ दिव्यासाठी अन्य खाद्यतेलांपेक्षा तीळ तेल अधिक लाभदायक असते.
Pitambari Products Pvt. Ltd., Gokhale Rd., Thane - 2. Tel. : 022 - 67035555
Contact : (Mumbai)9892458248, 9167492736, 7709138899, (Nanded) 9503350949, (Pune) : 9657704502

FAVOLOSA
Fabulously Crafted World
2 & 3 BHK Homes @ Balewadi



**Site Address** - FAVOLOSA Sno 31 Balewadi Behind Mitcon Opposite Balewadi Stadium, Pune

abhilasha
DEVELOPERS

**Office Address** - Ramkripa Apartments 759/17
Ramkripa Apartments Deccan Gymkhana
Champion Sports Lane Pune 411004
**Contact nos - 91-20- 25652015/16**




# Shrirang

Enjoy Colourfilled life @ Shrirang

## Situated right opposite the Hill Behind VED Bhavan in Kothrud

**Site Address** - Plot number 100 Bhusari Colony Behind Ved Bhavan,S no 78/19 Pune 411038.

**2 bhk and 3 bhk luxurious flats available**

**Office Address** - Ramkripa Apartments 759/17 Ramkripa Apartments
Deccan Gymkhana Champion Sports Lane Pune 411004 Contact nos - 91-20- 25652015/16

abhilasha
CONSTRUCTION

## अगदी आरामात कुठेही बसा...

### सप्रे बॅककम्फर्ट

### सप्रे बॅकगार्ड

**4 चाकी गाडी चालवताना अत्यंत आरामदायक व उपयुक्त वजनास अत्यंत हलके-सहलीला जाताना बरोबर घेऊन जाता येईल.**

गाडी चालवताना किंवा जास्त वेळ बसून काम करत असाल तर पाठीला व मणक्यावर ताण येतोच. 4 व्हिलरसाठी व कोणत्याही खुर्चीत आरामात बसण्यासाठी अत्यंत उपयुक्त .




लहान साईज **Rs. 900**

मोठा साईज **Rs.1500**



Curved Back Guard **Rs. 3100**

Curved Magnetic Back Guard **Rs. 3800**

(खुर्चीसाठी)

### सप्रे योगा सीट

पाठीला किंवा पायाला रग लागत नाही.
भारतीय बैठकीत आरामात बसा.

**सुखदायक बैठक**
**योगा सीट Rs.1575**



(भारतीय बैठकीसाठी)

परगावच्या ग्राहकांनी कुरियरचे **Rs. 300** जास्तीचे पाठवावे.

---

**वाचन, लेखन, सुंदर हस्ताक्षर आणि एकाग्र बैठक ह्याच चांगल्या सवयी उत्तम व्यक्तीमत्व घडवतात.**

**आजच सप्रे मल्टीपर्पज टेबल घरी आणा आणि आपल्या मुलांच्या व्यक्तीमत्वात भर घाला.**



↑ लॅपटॉपकरिता

| रेग्युलर मल्टिपर्पज टेबल ३ साईजेस मध्ये उपलब्ध! |
|---|
| **मिनी-** ₹ 850/- |
| **मिडियम -** ₹ 1200/- |
| **जंबो -** ₹ 1400/- |
| **सुप्रीम -** ₹ 2000/- |
| फुल इम्पिरियल साईज टेबल 24'' x 32'' ₹ 3000 |



↑ इंजिनिअरिंगसाठी फुल इंपिरियल टेबल ₹ **3000/-**

| मल्टीपर्पज ब्लॅकबोर्ड टेबल |
|---|
| **12"x 24" -** ₹ 1200/- |
| **15"x 24" -** ₹ 1400/- |
| **18"x 24" -** ₹ 1600/- |
| **18"x 30" -** ₹ 2000/- |



↑ गृहपाठासाठी

| भिंतीवर लावण्यासाठी होमस्टडी ब्लॅकबोर्ड ५ साईजेसमध्ये उपलब्ध ! |
|---|
| **12" x 24" -** ₹ 350/- |
| **15" x 24" -** ₹ 700/- |
| **18" x 24" -** ₹ 800/- |
| **18" x 30" -** ₹ 1000/- |
| **24" x 36" -** ₹ 1400/- |

परगावच्या ग्राहकांनी **इंजिनिअरिंग टेबलसाठी रु. ५००** व इतर सर्व टेबल्ससाठी रु.**३५०** जास्तीचे मनीऑर्डर किंवा बँक ट्रान्सफरने पाठवावे.

---

**सप्रे बोर्डस्**

पहिला मजला, चित्रशाळा भवन, भानुविलास चौक,विजय टॉकिजच्या अलिकडे,
लक्ष्मी रोड, पुणे 30. फोन : 2445 9149, 93710 15193
वेळ : सकाळी 10.30 ते 2 दुपारी 4.30 ते 8.00 email : sapreboards@gmail.com

* वरील सर्व किंमती सहा महिन्यासाठी वैध.

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!




**कोंकण काजू**

उत्पादक :

कोकण काजू    सांडगी मिरची

फणस–तळलेले गरे    काजूकतली

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१

**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

# वसुधा एंटरप्रायजेस

इंटरिअर डेकोरेटर्स

**श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८**

**▪ फर्निचर ▪ प्लंबिंग ▪ पेंटींग ▪ फॅब्रिकेशन ▪ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ▪ अॅल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ▪ पार्टिशन्स ▪ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ▪ लॉफ्ट टँक ▪ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ▪ किचन ओटा एक्स्टेंशन ▪ वॉल टायलिंग ▪ फ्लोरिंग ▪ किचन ट्रॉलीज ▪ लॉफ्ट क्लोजींग ▪ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ▪ बाथरुम रिनोव्हेशन ▪ सन कंट्रोल फिल्म ▪ वायरिंग ▪ पीव्हीसी फ्लोरिंग.**

**वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...**
**... सर्व सेवा एकाच छताखाली**

# निकेत फोटोज्

कर्वेनगर शाखा

**सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५**

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

**❋ अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी**
**घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा**

# मध्यमवर्गीयांचे नायक - व. पु. काळे

**व.पुं. चे आणखी एक वैशिष्ठ म्हणजे ते जसे कथा लिहतात तसे ते कथा निवेदक पण आहेत. कथा वाचणे वेगळे व कथा ऐकणे वेगळे. ज्यांनी व.पुंचे कथा कथन ऐकले आहे त्यांना त्यांच्या कथा वाचताना कथा बोलकी होते याची जाणीव होते. त्यांच्या बऱ्याच कथा वाचकांच्या मनात रेंगाळत राहतात.**

व.पुं.च्या 'कुचंबणा' या कथेवर हिंदीत 'पिया का घर' हा चित्रपट निघाला. हा चित्रपट गाजला व या चित्रपटातले 'ये जीवन है, इस जीवन का यही है, यही है रंगरूप' हे गाणे आजपण लोकप्रिय आहे. व.पुंनी संवादावर प्रेम केलं. माणसाच्या वृत्तींवर लिखाण केल. व.पुंच्या आवडीचा विषय म्हणजे मानवी संबंध. नेमका हाच आशय या गाण्यात आला आहे.

व.पुं. काळे यांचे निधन होऊन दहा वर्षे होऊन गेली. इंटरनेट व इमेल या माध्यमातून व.पुंची जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी छोटी वाक्ये, उतारे, व.पु. प्रेमी एकमेकांना पाठवत असतात. आज इंटरनेटवर सगळ्यात लोकप्रिय लेखक व.पु. च आहेत. कुठल्याही पुस्तक प्रदर्शनात, संमेलनात व.पुंच्या पुस्तकावर वाचकांच्या उड्या पडत असतात. व.पुं.च्या पुस्तकांना खूप मागणी असते.

व.पुं. स्वतः मध्यमवर्गीय. त्यांच्या सगळ्या कथा या मध्यमवर्गीय माणसांचं सुख दुख सांगणाऱ्या त्यांच्या कथेचे नायक कुलकर्णी, गोखले, पेंडसे, देवस्थळी, देशपांडे असे आपल्या भोवती वावरणारे. या सगळ्यांचे लग्न झालेले असते. व्यवसायाने हे सर्व नोकरदार, डॉक्टर्स, वकिल, प्राध्यापक असतात. नोकरदार व्यक्ती बहुदा क्लार्क असतात. त्यांच्याकडे स्कुटर असते. घरात रेडिओ, टि.व्ही, फ्रिज, असतो. नवरा-बायकोत प्रेम असते, पण लैंगिक तणाव असतो. संसारात छोटे मोठे प्रश्न भेडसावत असतात. वाचक कथा वाचत असताना त्यात हरवून जातो. आपलेच आयुष्य तो कथेत बघत असतो. कळत न कळत तो व.पुंच्या प्रेमात पडतो. व.पुंच्या लोकप्रियतेचे व यशाचे हेच रहस्य असावे.

व.पुं.च्या कथांचा निवेदक पुष्कळदा मी आहे. वाचक पण कथा मी म्हणूनच वाचतो. या प्रथमपुरूषी निवेदनामुळे कथेशी जवळीक निर्माण होते. 'कर्मचारी वंदना सामंत' या कथेत मी व.पु.काळे नावाचे पात्र उभे केले आहे. या कथेत त्यांनी मी वसंत पुरूषोत्तम काळे, मी एक लेखक आहे असे निवेदन केले आहे. मी या निवेदनामुळे कदाचित व.पुं.च्या कथा लोकप्रिय झाल्या असाव्यात. त्यांनी फॅन्टसी या प्रकारच्या कथा पण बऱ्याच लिहल्या. हा प्रकार त्यांना खूप आवडायचा. 'वाघच पण मिस्टर वाघ नव्हे' या कथेत वाघ बँकेत शिरतो. लोक पिंजऱ्यात व स्वत: मोकळा हे बघून त्याला आनंद होतो. आणखी विशेष म्हणजे सौ. वाघ या कर्मचारिणिचे नाव ऐकून तो चक्क लाजतो. आपला रिंगमास्टर भगवानराव बायकोपुढे कसा शेळी होतो हे पण तो सांगतो. 'चौकटीतील वहिनी', 'हातमोजा' या कथापण फॅन्टसीच्या वळणावर जातात.

व.पुं. चे आणखी एक वैशिष्ठ म्हणजे ते जसे कथा लिहतात तसे ते कथा निवेदक पण आहेत. कथा वाचणे वेगळे व कथा ऐकणे वेगळे. ज्यांनी व.पुंचे कथा कथन ऐकले आहे त्यांना त्यांच्या कथा वाचताना कथा बोलकी होते याची जाणीव होते. त्यांच्या बऱ्याच कथा वाचकांच्या मनात रेंगाळत राहतात. त्यांनी सामान्य माणसांच्या कथा लिहल्या. सामान्य माणसांत असामान्यत्व पाहिलं. 'घर हरवलेली माणसं' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, ''मला निरनिराळ्या संसारानी कोडी घातली. ती कोडी सोडविण्याचा मी प्रयत्न केला, त्यांच्या कथा झाल्या.'' 'करंजी' ही त्यांची भन्नाट कथा. सुरवातीला कथाकथनात ते नेहमी ही कथा सांगायचे. आपण म्हणजे आवरण, बायको म्हणजे सारण. संसाराच काटेरी चाक आपण आपल्या अंगावरून फिरवून घ्यायचं, पण आतल्या सारणाला धक्का लागता कामा नये. आपण नेहमी करंजी खातो, पण आपल्याला कधीही हे सूचत नाही, पण व.पुंना हे सुचलं व सुंदर कथा तयार झाली.

वास्तु हा व.पुं.चा आवडीचा विषय. ते आर्किटेक्ट झाले. वास्तुपेक्षा त्यांना प्रिय होती वास्तु जीवंत करणारी माणसं. मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशन मध्ये ते आर्किटेक्ट म्हणून लागले. त्यांना थंच अनेक माणसे भेटली. त्यांचं निरिक्षण होत गेलं आणि त्यातून कथानक उमलत गेलं. त्यांच्या कथातील पात्र अवती भवती सहज कुणालाही भेटू शकतील अशी होती, आणि म्हणूनच त्यांच्या कथा वास्तववादी झाल्या व लोकप्रियही झाल्या. Man behind Machine is more important than machine या मताचे ते होते. त्यांनी संवादावर प्रेम केलं. त्यांनी त्यांच्या अनेक कथांतून संवादाला महत्व दिलं. अबोला धरून प्रश्न सुटत नाहीत, उलट वाढतात. अबोल्यामुळे मनात तेढ वाढते. संवाद साधावा, विचार पटोत अथवा न पटोत संवाद हा पाहिजेच. संवादानं माणसं जोडली जातात. यावर त्यांचा विश्वास होता. त्यांचा 'कर्मचारी' हा सगळ्यात अप्रतिम कथा संग्रह या पुस्तकाला राज्यशासन पुरस्कार मिळाला. ते मराठी साहित्य संमेलनाचे कधीही अध्यक्ष झाले नाहीत. अमेरिकेत

**(कृपया पान क्र. ३२ पहा)**



प्रत्येकाने जेवणाप्रमाणे व्यायामालाही वेळ दिला पाहिजे.

।।श्री।।
स्थापना : गणेश चतुर्थी १९९३
सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा
प्रकाश जठार यांचे
ज्योती एन्टरप्रायझेस
(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व
सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)
पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नक्षर,
गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,
फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२


संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

सातारी पेढा शॉप
स्थापना-१९३६



मशहूर
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

चटकदार
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का
पौष्टीक खाद्य भांडार
अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

# महत्त्व दिवसांचे

प्रत्येक उगवणारा दिवस तसा महत्वाचा असतो. सूर्योदयाने दिवसाची सुरवात होते आणि आपण आजच्या दिवशी काय करायचे हे ठरवत असतो. मग आपला संपूर्ण दिवसाचा प्रवास सुरू होतो. कार्य करत करत संध्याकाळ होते व आपण घरी आल्यावर भोजन आणि सर्व गृहकृत्ये करतो व रात्र होताच आपण झोपण्याची तयारी करतो. तत्पूर्वी प्रत्येक जणाने आज सकाळ पासून रात्री पर्यंत ठरवलेल्या गोष्टी केल्या कां? कुणावर रागावलो, कुणाबद्दल द्वेष केला, कोणास दुखावले इ. स्मरण करत झालेल्या गोष्टींचे मनन करून चांगल्या कृत्यांसाठी प्रसन्नता तसेच कटुकृत्यांपोटी आपण खेद व्यक्त करून ईश्वरचरणी नतमस्तक होऊन क्षमा प्रार्थना ही करतो हा झाला आपला दैनंदिन कार्यक्रम.

जगामध्ये तसेच भारतामध्येही कांही दिनविशेष आहेत व ते भारतासह जगभर साजरे केले जातात. या ना त्या कारणाने या दिवसांना महत्व आहे त्या सर्व दिनांचे संकलन खालीलप्रमाणे महिन्यानुसार देत आहे.

### एप्रिल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय नौका दिन | – | ५ एप्रिल |
| २. | जागतिक आरोग्य दिन | – | ७ एप्रिल |
| ३. | अग्नीशामक दिन | – | ८ एप्रिल |
| ४. | जालियनवाला बाग हत्याकांड स्मृतीदिन | – | १३ एप्रिल |
| ५. | अपंग सहायता दिन | – | २० एप्रिल |
| ६. | वसुंधरा दिन | – | २२ एप्रिल |
| ७. | जागतिक पुस्तकदिन | – | २३ एप्रिल |
| ८. | जलसंपत्ती दिन | – | २४ एप्रिल |







### मे

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | जागतिक कामगार दिन | – | १ मे |
| १०. | महाराष्ट्र दिन | – | १ मे |
| ११. | जागतिक सूर्य दिन | – | ३ मे |
| १२. | जागतिक हास्य दिन | – | ४ मे |
| १३. | जागतिक अस्थमा निवारणदिन | – | ६ मे |
| १४. | रेडक्रॉस दिन | – | ८ मे |
| १५. | येलेसमिया दिन | – | ८ मे |
| १६. | जागतिक मातृदिन | – | ११ मे |
| १७. | विज्ञान तंत्रज्ञान दिन | – | ११ मे |
| १८. | परिचारिका दिन | – | १२ मे |
| १९. | जागतिक कुटुंबदिन | – | १५ मे |
| २०. | जागतिक दूरसंचार दिन | – | १७ मे |
| २१. | संग्रहालय दिन | – | १८ मे |
| २२. | दहशतवाद हिंसाचार विरोध | – | २१ मे |
| २३. | राष्ट्रकुल दिन | – | २४ मे |
| २४. | जागतिक तंबाखु विरोधी दिन | – | ३१ मे |

### जून

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | पर्यावरण दिन | – | ५ जून |
| २६. | जागतिक दृष्टी दान दिन | – | १० जून |
| २७. | जागतिक रक्तदाता दिन | – | १४ जून |
| २८. | जागतिक संगीत दिन | – | २१ जून |
| २९. | जागतिक पक्षाघात निवारण दिन | – | २४ जून |
| ३०. | सामाजिक न्याय दिन | – | २६ जून |
| ३१. | मादक पदार्थ विरोधी दिन | – | २६ जून |





सत्कृत्य करणारे लोक सत्कृत्यांनी अमर होतात.

**WITH BEST COMPLIMENTS FROM**

# मे. डी.व्ही. भाटवडेकर

६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू. म. वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११ ०३०,

**कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लाँग क्लॉथ, पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीटस्, टॉवेल्स, रेडीमेड पायजमे बंडी - कुडते - बर्म्युडा - ३/४ पँटस्**

**अधिकृत विक्रेते**
**युनायटेड होजिअरी - कॅप्टन होजिअरी**

## क्लॉथ मर्चंटस्

फोन नं. - २४४५६०४७

*With Best Compliments from,*

REINDEER

# Reindeer Apparels

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

## श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला - ३६०० चौ. फुट
वधू-वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला - ३६०० चौ. फुट
वधू-वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

SHREE ANNAPURNA CATERERS

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११ ००४
दूरध्वनी : ०२०-२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०-२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# वधु पाहिजे

१९/१०/१९७९/५.४''/BPT/ प्रायव्हेट/२०,०००/कऱ्हाडे/ गार्ग्य/ कन्या/देव/O+ve/२५४३८६४६ - तांबे

२६/४/१९७७/५.५''/B.A. Computer Basic Course/-/-/कऱ्हाडे/अत्रि/ देव/A positive/२४४५०४७०-डिंगणकर

२/१२/८४/५.२''/१०वी/-/-/-/कऱ्हाडे/अत्रि/मीन/ मनुष्य/ o+ve/९६५७२७४२५५ – टेंबे

२६/१२/१९८०/५.७''/बी-कॉम, सॉफ्टवेअर इंजिनिअरचा ॲडव्हान्स डिप्लोमा/मगरपट्टा/३,८५,०००/कऱ्हाडे/ अत्रि/सिंह/राक्षस/ २५२८४६३७ - नानल

९/१/१९७४/५.६''/बी.कॉम/फायनान्स व ॲडमिनिस्ट्रेटर/२५००० दर महा/ कऱ्हाडे/अत्रि/कर्क/देव/-/ २६२१९९७५/२४३५२२७२ - सप्रे

२/४/१९७४/१८०सेंमी./बी.कॉम./Sr. A/Cs Officer/१०,०००/कऱ्हाडे/अत्रि/ -/-/-/ ०२३३-३१०२१२ – गुणे

१४/९/१९८२/१६८ सेंमी/१० वी+ विशारद/खाजगी व्यवसाय (गायनवर्ग)/ कऱ्हाडे/गार्ग्य/ कर्क/देव

१३/०८/१९७४/१८०सेंमी./M. Com, D.B.M./Accounts Executive/१००००/कऱ्हाडे/अत्रि/ वृषभ/मनुष्य/A+ve/०२५३-२५३१०८५ - टेंबे

२६/१०/१९७३/५.९''/B.Com, ठाणे येथून MBA लाईफ इन्शूरन्स कॉर्पोरेशन मध्ये डेव्हलपमेंट ऑफिसर/२५०००/-/ कऱ्हाडे/अत्रि/तूळ/देवगण/ o+ve/२५३२४२५४- टेंबे

२१/११/१९७२/५.५''/B.A.अकांऊंट डिझाइन् कॉम्प्यूटर/८,०००/- कऱ्हाडे/ काश्यप / मिथुन/मनुष्य/AB+ve/ २७६१३४९५ - पंडीत

६/१/१९७५/१६४/एम. आर्क(मास्टर इन आर्किटेक्चर) / आर्किटेक्चर कन्सलटन्सी/५०,०००/देशस्थ कऱ्हाडी/काश्यप/तुळ/राक्षस/O +ve/९४२२८११०१५ - जोशी

११/५/७५/५.८/B.Com./स्टोअर्स डिपार्टमेंट/७०००/-देशस्थ कऱ्हाडी/ वसिष्ठ/मेष/राक्षस/ A +ve/२४२३०८९५ - काळे

२८/०८/१९७५/१६५/१२वी/ पौरोहित्य/५ ते १० हजार/ कऱ्हाडे/भारद्वाज/मेष/मनुष्य/ AB+ve/९७६५८०६२१९ - काजरेकर

९/२/१९७६/५.५/इ.अ./७०००/-/ देशस्थ ऋग्वेदी/ विश्वमित्र/वृषभ/मनुष्य/ ९६५७९८१२४७

६/५/१९७६/५.११''/DME,MBA Finance/Dy. Manager (purchase)/३५,०००/-/Atri/ Karka/O+ve/०२०-२५६५२००० - कारखानिस

२७/९/१९७९, ५'-४'', B.A/-/ कऱ्हाडे/-/अत्रि/वृश्चिक/मनुष्य/ B Positive/२६०५७७६०/शेवडे

कृपया कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे यांचेशी संपर्क साधावा.

# वर पाहिजे

कु. अमृता हेमचंद्र तांबे
जन्मतारीख १४.९.१९८२
(चौदा सप्टेंबर एकोणीसशे ब्याऐंशी)
वय - ३१ वर्षे
राशि- कर्क
गण - देव गण, मध्य नाडी
गोत्र - गार्ग्य
उंची - ५ फूट ६ इंच
वर्ण - सावळा. जात कऱ्हाडे ब्राह्मण.
शिक्षण - १०वी पर्यंत, इंग्रजी माध्यम, गायन - विशारद (प्रथम) उत्तीर्ण, वादन-संवादिनी (हार्मोनियम) मध्यमा उत्तीर्ण.
व्यवसाय - गायन वादनाचे वर्ग चालविते.
वडील - हेमचंद्र अमृत तांबे (निवृत्त सेनाधिकारी)
भावंडे - १ मोठा भाऊ, विवाहीत, परदेशात.
वर अपेक्षा - निर्व्यसनी, संगीताची आवड असणारे, गायन वादनाचे क्लासेस करू देणारे, कऱ्हाडे ब्राह्मण, अनुरुप.



## लेव्हल

सौ. घाटपांडे (स्वयंपाकघरातून नवऱ्याला)- अहो, ऐकलंत का, आपल्या बंटीचा जरा अभ्यास घ्या न्या. उद्या तो चवथीत गेल्यानंतर का कोणी तुम्हांला सांगणार आहे?'



**हास्य कारंजे : केशव फडणीस, पुणे**

## लेट

शेजारी : अहो, हे काय? बंडोपंत तुम्ही काय झेलणार आहात?
बंडोपंत : आमच्या तिसऱ्या मजल्यावरून घड्याळ खाली पडतेय.
शेजारी : ते एव्हाना खाली पडलेही असेल.
बंडोपंत : नाही, ते पाच मिनिटे मागं आहे.



जीवन केवळ चैनीची वस्तू नसून, ती कर्तव्याची भूमी होय.

# ।। रेशीम गांठी ।।

वर्ष १६ वे

पदवीधर–उच्चशिक्षित
ब्राह्मण–आंतरजातीय स्थळांसाठी
वाजवी फी • विविध मेळावे
पत्रिका • गुणमेलन • भविष्य
विवाह समुपदेशन



संपर्क : देऊस्कर
०२०-२५४६९१५८ / ९८८११५२७४६

ऑनलाईन नोंदणी
www.reshimgathi.com



माऊली हॉल
मिनी माऊली हॉल
सर्वेश हॉल
मंगलमूर्ती सभाग्रह
ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.

# सुयश कॅटरर्स

१९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा

आपुलकीने सेवा देणारी माणसं

संपूर्ण व्यवस्थापन



सुहास व स्वाती पंडित
यांचे भ्रमणध्वनी
९८३३३०४०३३
९८३३०४२७३३

अन्य संपर्क
सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८
योगेश कानेटकर-९८१९०३९३५९

सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)

संस्थावृत्त

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुलुंड, तिळगुळ समारंभ

कऱ्हाडे ब्राम्हण संघ मुलुंड शाखेचा तिळगुळ समारंभ हॉलच्या उपलब्धतेनुसार

(संक्रांत झाल्यावर!) दि. १०.२.१४ सोमवार रोजी संध्या. ५ ।। ते ८ यावेळी 'विरंगुळा' केंद्र, मुलुंड पूर्व येथे संपन्न झाला. अपरिहार्य कारणामुळे अध्यक्ष श्री. मंडपे येऊ न शकल्याने श्री. प्रकाश आंबर्डेकर हे अध्यक्षस्थानी होते.

कार्यवाह माधुरी शेंबेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अनघा खांडेकर आणि माधुरी शेंबेकर यांच्या श्लोकपठणाने कार्यक्रमाला सुरूवात झाली. संघातील दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली वहाण्यात आली.

माधुरी शेंबेकर यांच्या प्रास्ताविकानंतर नुकत्याच झालेल्या सहली विषयीचे विचार लिहून आणायला सांगितले होते. त्याप्रमाणे १) स्नेहा कशिकर, २) श्रीपाद सप्रे, ३) प्रकाश आबर्डेकर यांनी आपले लेख वाचून दाखवले. प्रत्येकाच्या लिखाणात वैविध्य होते. उपस्थितांनी सहलीचा पुन: प्रत्यय घेतला. न आलेल्यांना छान कार्यक्रम आपण चुकवला याची रुखरुख लागली. अशा प्रकारच्या लेखनामुळे शालेय जीवनातील निंबंध लिहायची आठवण झाली असे श्री. श्रीपाद सप्रे यांनी आवजूर्न सांगितले.

श्रीपाद सप्रे यांनी संघातर्फे उद्योजकांसाठी सुरू करण्यात येणाऱ्या 'उद्योगवर्धिनी' विषयी सविस्तर माहिती दिली. आपल्या प्रत्येक कार्यक्रमात नवीन सभासदांचे स्वागत होते. यावेळी चार नवीन सभासद संघात सामिल झाले.

यानंतर मुलुंडमधील प्रसिद्ध आयुर्वेद डॉक्टर अश्विन सावंत यांचे 'शतायुषीभव' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांचा सविस्तर परिचय अशोक खांडेकर यांनी करुन दिला. प्रकाश आबर्डेकर यांनी भेटवस्तू देऊन डॉ.चे स्वागत केले.

डॉ. सावंत यांनी शतायुषी होण्यासाठी सांगितलेल्या गोष्टी उपस्थितांना मनापासून पटल्या. अतिशय अभ्यासपूर्ण आणि सर्व वयोगटांना समजेल अशा भाषेत डॉक्टरांनी आपले मुद्दे स्पष्ट केले. काही मुद्दे–

– आपले हृदय १२५ वर्षेपर्यंत चालू रहणारे अहो. त्यासाठी ज्या दिवसापासून प्राकृत आहार घ्यायला सुरूवात करु त्या दिवसापासून आरोग्य सुधारते.

– काय अवश्य खावे, कधी अजिबात खाऊ नये हे सांगताना उपयुक्त रेसिपी सांगितल्या.

– समाजात 'अल्झायमर'चे प्रमाण वाढत आहे. त्याचं प्रमुख कारण जागरण! घराघरातून रात्री १२ नंतर होणारे जागरण हळूहळू कमी व्हायला हवच पुढच्या पीढीला हे घातक आहे.

– आहारामध्ये अवेळी खाण्यामुळेच रोग निर्माण होतात. म्हणून रात्रीचे जेवण संध्या. ७ पर्यंत करून मग रात्री १/२ अख्खी फळं खाण्याची सवय लावून घ्या.

अशा महत्त्वाच्या अनेक गोष्टी आवजूर्न सांगितल्या. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे डॉक्टरांनी दिली आणि प्रत्येकासाठी अशी इच्छा केली की,

**जीवेत: शरद: शतम्।**
**पश्चेम् शरद: शतम्।**
**भद्रं शरद: शतम्।**
**श्रुणुयाम् शरद: शतम्।।**

राजीव आठल्ये यांनी यथोचित आभार व्यक्त केले. अनघा खांडेकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अल्पोपहार आणि चहाचा आस्वाद घेत जुन्या–नव्या ओळखी अधिक दृढ करीत कार्यक्रम संपन्न झाला.

धन्यवाद!

**– माधुरी शेंबेकर**
कार्यवाह, कऱ्हाडे ब्राह्मण संघ,
मुलुंड – ९८६९०४९८५२

## हास्य कारंजे : केशव फडणीस, पुणे

### मथुरा

**'मथुरेची मिठाई, मथुरेची मिठाई' असं ओरडत ती बाई सबंध गावभर हिंडून धंदा करीत असे. तिचा धंदा मोठा जोरात चालत असे. कारण मथुरेची मिठाई प्रसिद्ध होती. एकदा एका माणसानं तिला विचारलं, मथुरा आपल्या गावापासून इतकं लांब, तू हे रोजच्या रोज तिकडून आणून कसं जमवतेस?**

**मी कुठं म्हणते, मथुरेहून मिठाई आणली म्हणून! माझं नाव मथुरा आहे.**

### आत्याची सुटका

**'दुसऱ्याला हायसं वाटावं, सुख मिळावं असं एखादं तरी सत्कृत्य रोज करावं,' शिक्षक मुलांना वर्गात सांगत होते. 'आज कुणी असं चांगलं काम केलं सांगा बरं'!**

**'मी...मी..' बबलू म्हणाला, 'आज सकाळी मी माझ्या आत्याकडे गेलो होतो आणि मी तिच्या घरातून बाहेर पडलो तेव्हां ती इतकी खूष झाली की...'**

### जिंकण्याची कला

**प्रेसिडेंट लिंकन सर्वांबद्दल नेहमी चांगले बोले. एकदा एका स्त्रीने त्याला विचारलं. शत्रूचं नाश करायचा सोडून तुम्ही त्याच्याबद्दल दयाळूवृत्तीनं कसं बोलू शकता?'**

**'मॅडम, त्यांना मित्र बनवून मी त्यांचा नाशच नाही का करत?'**

### प्रॉमिसिंग

**पालक : चिंटू तर सांगत होता, तुम्ही त्याला अगदी प्रॉमिसिंग स्टुडंट म्हणता म्हणून..**

**टीचर : खरं आहे ते! घरी लेसन्स करीन म्हणून दरवेळी तो मला प्रॉमिस करतो, पण करत कधीच नाही.**

### कार्बन कॉपी

**तिला दोन जुळी मुलं झाली होती. त्यातला एक गोरा आणि एक काळा मुलगा पाहून आश्चर्यानं तिनं डॉक्टरांना विचारलं, 'डॉक्टर हे कसं काय?'**

**'मॅडम, जो गोरा आहे तो ओरिजिनल आणि दुसरा कार्बन कॉपी.'**



**चांगल्याला चांगला म्हणायला ही अंगी चांगुलपणा लागतो.**

## संस्थावृत्त

# रत्नागिरी येथील कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा पुरस्कार वितरण समारंभ संपन्न



**डावीकडून श्री. ढोल्ये, श्री. मुरवणे, श्री. आंबेकर, श्री. हळबे, श्री. कुवळेकर, डॉ. कलवारी आणि. सौ. गुणे.**

आमच्या संघाचा गुणवत्ता पारितोषिके आणि पुरस्कार वितरण समारंभ रविवार दि. १ डिसेंबर २०१४ रोजी संपन्न झाला. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून लांज्यातील सुप्रसिद्ध विधीज्ञ ॲड. श्री. विलास कुवळेकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दरवर्षीप्रमाणे वेदमंत्रपठणाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत हळबे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत आणि प्रास्ताविक केले. श्री. कुवळेकर यांचा परिचय संघाचे सदस्य डॉ. श्रीकृष्ण जोशी यांनी करून दिला. त्यानंतर संघाच्या अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री. कुवळेकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर संघाचे अध्यक्ष श्री. हळबे, उपाध्यक्ष डॉ. शरद प्रभुदेसाई आणि श्रीमती शुभांगी मुळ्ये, प्रमुख पाहुणे ॲड. श्री. विलास कुवळेकर आणि पुरस्कार प्राप्त मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केल्यानंतर त्यांच्याच हस्ते वायंगणी–मालवण येथील वे.मु.श्री. दत्तात्रय महादेव मुरवणे यांना आदर्श पौरोहित्य पुरस्काराने, राजापूर येथील सौ. राधिका रमेश गुणे यांना आचार्य नारळकर पुरस्काराने, रत्नागिरीतील ज्येष्ठ पत्रकार श्री. अजीत सुरेश आंबेकर यांना दर्पण पुरस्काराने, कसबा–संगमेश्वर येथील ह.भ.प. श्री. श्रीपाद रामकृष्ण ढोल्ये यांना आदर्श कीर्तनकार पुरस्काराने आणि हर्चे येथील डॉ. शंकर विठ्ठल कलवारी यांना धन्वंतरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याशिवाय वर्षभरात ज्यांना वेगवेगळे पुरस्कार मिळाले, त्यांनाही दरवर्षी गौरविण्यात येते. त्यामध्ये डॉ. शरद प्रभुदेसाई यांना कुसुमताई अभ्यंकर पुरस्कार मिळाल्याबद्दल, डॉ. श्रीकृष्ण जोशी यांना साहित्यभूषर पुरस्कार मिळाल्याबद्दल, श्री श्रीकांत पाध्ये यांना राष्ट्रशाहीर अमरशेख पुरस्कार मिळाल्याबद्दल, श्री. दा. गो. जोशी यांना पु.ना.गाडगीळ हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि श्री. सुनील जठार यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

त्यानंतर इ. ४ थी आणि इ. ७ वी स्कॉलरशीप मिळविलेले विद्यार्थी, इ. १० वी आणि १२ वीतील ८०% पेक्षा जास्त मार्क्स मिळविलेले विद्यार्थी तसेच पदवी, पदविकेतील प्रथमश्रेणी मिळविलेल्या विद्यार्थ्यांना विविध मान्यवरांच्या हस्ते गुणवत्ता पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

त्यानंतर पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपापली मनोगते व्यक्त केली. सर्वात शेवटी प्रमुख पाहुणे श्री. विलास कुवळेकर यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, अलीकडे पुरस्कार कसे दिले जातात, त्याचे निकष काय असतात याविषयी मनामध्ये साशंकता असते. मात्र कऱ्हाडे ब्राह्मण संघाने कोणतीही फाईल मागून पुरस्कार दिलेले नाहीत. त्यांचं समाजासाठीचं आणि सेवाभावी वृत्तीनं केलेलं कार्य लक्षात घेऊन समाजातील उत्तमोत्तम व्यक्तींची निवड करून त्यांना सन्मानानं हे पुरस्कार दिले आहेत. माझ्यापेक्षा वयाने ज्येष्ठ असलेल्या व्यक्तींना मला सन्मानित करण्याची संधी मला मिळाली. यापेक्षा वेगळे भाग्य ते कोणते.

या संपूर्ण कार्यक्रमाचं सूत्रसंचालन सौ. प्रतिभा शरद प्रभुदेसाई यांनी केले आणि आभारप्रदर्शन श्रीमती शुभांगी मुळ्ये यांनी केले. त्यानंतर उपस्थित सर्वांना अल्पोपहार आणि कॉफीपान देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**– सौ. ऋचा श्री. जोशी**
**कार्यवाह**

संस्थावृत्त

# आमची 'ओंकार रिसॉर्ट मुरबाडची सहल

मुलुंड

नमस्कार..... मित्र-मैत्रिणींनो..... बघा बघा ऽऽऽ पाहिलत, १ दिवस पिकनिकला जाऊन आल्यावर रिलेशनशिपमध्ये कसा फरक पडला तो! 'कऱ्हाडे ब्राह्मण संघ-मुलुंड' येथील माझ्या बंधु-भगिनींनोच्या ऐवजी मित्र-मैत्रिणींनो असा उल्लेख आपसुक व्हायला लागलाय.....

खर तर पिकनिकला माधुरीताईमुळे मी आले. माझी दुसरी बहिणही येणार होती. म्हणून मी निर्धास्त होते. पण आयत्यावेळी तिचं कॅन्सल झालं.... मनात म्हटलं बापरे...... पण बसमध्ये बसल्यापासूनच परकेपणा वाटलाच नाही. मध्यंतरी काही कारणानिमित्त माधुरीताईंबरोबर वाकणकरबाई, सप्रे, आठल्ये घरी आले होते. त्यामुळे आपोआपच मोकळेपणा निर्माण झाला होताच. असो.

२ तारखेला सकाळी ७.१५ वा. बस सुरू झाली आणि लहान मुलं जशी सहलीला निघताना आनंदीत होतात..... त्याचप्रमाणे आम्हीही खूश होतो. बसमधल्या सर्वांना भाग घेता यावा म्हणून भेंड्यांची सुरुवात झाली. जुनी-नवी न ऐकलेली अशा विविध गाण्यांना सुरूवात झाली. मीही 'ख' आल्यावर 'खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे'...... म्हणून आम्हीही सहभाग करतोय हे दाखवून दिले. डी. सातावळेकरांनी छानपैकी बसच्या २ रोजा सांभाळून घेतलं होतं.

वाटेमध्ये एक आवश्यक स्टॉप घेऊन आम्ही परत पुढच्या प्रवासाला सुरुवात केली. साधारण ९.१५ च्या सुमारास आम्ही मुरबाडला पोचलो. आजुबाजुच्या निसर्गरम्य परिसर, छोटे छोटे लाल मातीचे रस्ते, वातावरणातला शांतपणा, गावची निर्मळ लोक दिसायला लागल्यावर गाव जवळ आल्याची जाणीव झाली. ओंकार रिसॉर्टमध्ये आल्यावरच आजचा दिवस मजेत जाणार हे जाणवलं..... मोकळ प्रशस्त आवार, लहान मुलांपासून-मोठ्यांपर्यंत सर्वांची करमणूकीची सोय-स्विमींग पूल, रेन शॉवर (डान्स) पाहून सर्वच उत्साहीत झाले होते.

डायनींग हॉलमध्ये नाश्तासाठी प्रवेश केल्यावर टी.टी.चे टेबल दिसल्यावर हळूहळू सर्वजण आपला हात साफ करायला लागले. नंतर गरमागरम मराठमोळा नाश्ता म्हणजे पोहे, उपमा, गरमा गरम चहा घेतल्यावर सर्वजण फ्रेश झाले. नंतर रिसॉर्टच्या मालकाने मकरंदने इथे काय काय आहे. काय काय करा, काय काय पहा, याबद्दल मार्गदर्शन केले. बाहेर आलो तर कार्किडे कपल बॅडमिंटन खेळतयं.... मग आम्हीही जॉइन झालो. बॅटला शटल लागलं की खुश व्हायचो..... कॉलेजचे दिवस आठवून..... आता प्रॅक्टीस नसल्यामुळे..... वगैरे डॉयलॉग ऐकून सर्वांची हसता हसता पुरेवाट होत होती.

नंतर क्रिकेट सुरू झाले. बसचा पुढचा मोठा टायर आमचे स्टंम्स् झाले. वेंगसरकर, अझरुद्दीन जमान्यातले आमचे क्रिकेटरही छान खेळत होते..... फिल्डींग करताना, बॅटींग करताना मजा येत होती. त्यानंतर घसरगुंडी, झोपाळा, सी-सॉ सगळ्याचा सगळ्यांनीच मनमुराद आनंद लुटला.

आता स्विमींगला जायचे म्हणून सर्वांनी चेंज केले. या स्विमींग पुलचे वैशिष्ट्य म्हणजे. इथे स्वीमींग कॉच्युमचे बंधन नव्हते. त्यामुळे सर्वजण मस्तपैकी पाण्यात उतरले होते.

आम्ही काहीजणं गावामध्ये स्वामी समर्थांचे एक देवस्थान होते. तिथे जाऊन यायचे ठरले. म्हणून तिथे गेलो. वाटलं होत दर्शन घेऊन लगेच परतु परंतु त्याचवेळी देवळात आरती चालू होती. त्यानंतर श्लोक, प्रार्थना अशा प्रसन्न वातावरणात तासभर कसा निघून गेला समजलच नाही. परतलो-तर आमचे बाकी उत्साही वीर स्वीमींग, रेन डान्स सर्व आटोपून बसलेले....

जेवणाला थोडा वेळ होता म्हणून आम्ही काहीजण परत स्वीमींग पूलमध्ये उतरलो. स्वीमींग न येणारी मी खांडेकर आणि आठल्ये काकांच्या 'टिप्समुळे' २ राऊंड मारू शकू एव्हढ पोहू शकले. माझ्याबरोबर, सुमेधा, मधुश्री आणि कन्यकाही एन्जॉय करीत होते. त्यानंतर थोडा वेळ आम्ही रेन डान्स करून तीही हौस भागवून घेतली. तोपर्यंत जेवणाची वेळही झाली होती. आणि चेंज करून आम्ही जेवायला परत डायनींग हॉलमध्ये आलो.

जेवणातही मराठमोळं वातावरण जाणवत होतं. इतर साऱ्या नेहमीच्या जेवणाबरोबर गरमा-गरम झुणका, भाकरी, घरचं केलेल श्रीखंड मजा आणत होत. सर्वांच जेवण झाल्यावर वर एक मोकळा असा हॉल होता तिथे आमचे करमणुकीचे दुसरे सेशन सुरू झाले.

सातावळेकरांनी लकी कोण असा एक नवीनच मजेशीर गेम घेऊन खेळाला सुरूवात करून दिली. त्यामध्ये विविध प्रश्न विचारून उत्तरे न देताच लोक आऊट होत होते. तरीही जो राहील तो लकी! अजूनही काही मजेशीर गेम घेतले. त्यात आठवणीत राहील असा एक म्हणजे त्यांनी 'ध' अक्षर देवून शेवटी 'ध'च येईल असा उखाणा घ्यायला सांगितला. आणि मोघे यांनी काही सेकंदातच एक लाजबाब उखाणा तयार करून वाहवा मिळविली. त्यानंतर छान छान कविता वाचन, बासरी वादन आणि मधुश्रींचे गाणे यांनी वातावरणात टवटवीतपणा आणला. त्यानंतर सुमेध आणि मधुश्रीने एक फुग्यांचा अनोखा असा गेम घेतला. एक तास कसा निघून गेला समजलचं नाही. त्यामध्ये वयात ज्येष्ठ अशा मंडपे काका आणि माईणकर काका या दोघांनी पहिला नंबर पटकावला. त्यानंतर जान्हवीने इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्दाचा गेम घेतला आणि किती सहजपणे आपण इंग्रजी शब्द मराठी म्हणून वापरतो ते जाणवले. कारण काही शब्दांचे मराठी शब्दच आठवत नव्हते. त्यामध्ये सर्वात जास्त मार्कस् सुमेधला मिळाले. शेवटी माधुरीताईने राम-कृष्ण असा मेंदूला शरीराने सतर्क करणारा मजेशीर गेम घेतला आणि त्यामध्येही आपल्या संघाचे अध्यक्ष मंडपेकाकाच पहिले आले.

या दरम्यान संध्याकाळचा चहाही झाला आणि घड्याळाने घरी परतण्याची वेळ जवळ येत चाललेय हे जाणवून दिले. त्यानंतर वाढदिवस समारंभ आभार यांनी आजच्या दिवसाची सांगता झाली. आतापर्यंत सुरळीतपणे पार पडलेल्या सगळ्या कार्यक्रमांचे श्रेय हे निश्चीतपणे आपल्या सर्व कमिटी मेंबरचे होय. सर्व सुरळीत होण्यासाठी यांनी आधी घेतलेले कष्ट जाणवत होते.

बसमध्ये बसताना शिदोरी म्हणून रिसॉर्टमधून सर्वांसाठी बटाटेवडे घेतलेले होतेच. परततानाही सकाळचाच उत्साह सर्वांमध्ये दिसून येत होता. कारण आता भेंड्याऐवजी आरत्या, लावण्या सुरू झाल्या. आठल्येकाकांनी एकसो एक आरत्या, लावण्या म्हणून मजा आणली. त्यांचे पाठांतर आणि खडा आवाज लाजबाब!!! मधुश्रीही मस्त लावण्या म्हणत होती. एकंदरीत सर्व वातावरण उत्साहीत होते, त्यानंतर प्रभु घाटेंचे बासरीवादन सुरू झाले. अतिशय निर्मळ, पवित्र असे बासरीचे ते सूर सर्वांचेच मत प्रसन्न करीत होते. मधेच माधुरीताईने उरलेल्या गिफ्ट अशा कौशल्याने वाटल्या की घरी परतताना प्रत्येकाच्या हातात सहलीची एक तरी आठवण राहील.

अशा प्रकारे या वातावरणात प्रवासातले २।।-३ तास कसे गेले कळलेच नाही......... आणि अशा या रम्य आठवणी घेऊनच मी घरी परतले.

**– स्नेहा काशीकर**
**९८६७५९९९९०**
**(कऱ्हाडे ब्राम्हण संघ – मुलुंड)**



कविता हे ज्ञानपुष्पाचे अत्तर असते.

संस्थावृत्त

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे, कार्यक्रम वृत्तांत

मागील वर्षी म्हणजे दि. ३० नोव्हेंबर व दि. १ डिसेंबर २०१३ हे दोन दिवस कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे व अभिमानाचे होते. बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली आयोजित संगीत स्पर्धेच्या अंतिम फेरीचे आयोजन यंदा बडोद्याच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघास मिळाले होते. इतक्या मोठ्या प्रमाणावर स्पर्धेच्या सोहळ्याचे आयोजन करणे हे खरोखरच खूप आव्हानाचे होते. संघाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र पानवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यकारिणी मंडळाने अक्षरश: दिवस-रात्र मेहनत करून या कार्यक्रमाची जय्यत तयारी केली होती.

दि. ३० नोव्हेंबर या दिवशी रेल्वे इन्स्टिट्यूट, प्रतापनगर, बडोदे येथे या कार्यक्रमाची सुखात झाली. मुख्य अतिथी म्हणून श्री. जे. जी. माहुरकर (जनरल सेक्रेटरी, वेस्टर्न रेल्वे मजदूर संघ) उपस्थित होते. त्याचबरोबर अतिथी विशेष म्हणून सौ. मृणालिनी कामत (प्रभारी अध्यक्ष मराठी विभाग, म.स.विद्यापीठ, बडोदे) उपस्थित होत्या. त्याचबरोबर बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सर्व पदाधिकारीही उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलन व ईशस्तवनाने झाली. त्यानंतर सर्व पाहुण्यांच्या संक्षीप्त मनोगतानंतर सर्वांसाठी एक सुंदर रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम कऱ्हाडे ब्राह्मण संघाने सादर केला.

दि. १ डिसेंबर २०१३ हा दिवस तर खरोखर संघासाठी अक्षरश: गर्वाने छाती फुलून जाईल तरी अत्यानंदाने डोळेही भरतील अशा प्रकारचा अजरामर दिवस ठरला. दुपारी ३.०० वाजता सयाजी विहार क्लब, या ठिकाणी कार्यक्रमाची सुरवात झाली. प्रवेशद्वारावर अत्तर, गुलाबाचे फुल, पेढा यासोबत सुरेल सनईचे सूर ऐकायला येत होते. वातावरण अक्षरश: एखाद्या मंगल कार्याइतकेच प्रसन्न बनले होते. या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून श्री. अजय अष्टपुत्रे (वाईस-डीन फॅकल्टी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स) लाभले होते. त्याचप्रमाणे या कार्यक्रमास बडोद्याच्या राजमाता श्रीमंत शुभांगिनीराजे गायकवाड यांनी उपस्थित रहाण्याची कृपा केली होती. तसेच त्यांच्या शुभहस्ते स्पर्धकांना बक्षिसे दिली जाणार होती. परंपरेप्रमाणे दीपप्रज्वलन व ईशस्तवनाने कार्यक्रमास सुरवात झाली. मुख्य अतिथी, तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पदाधिकारी यांची ओळख व स्वागत करून मुख्य कार्यक्रमास सुरवात झाली. स्पर्धेस परीक्षक म्हणून श्री. हेमंत कोठारी, सौ. पल्लवी जोशी व श्री. देवदत्त डाकोरकर लाभले होते. या स्पर्धेचे स्पर्धक म्हणजे भारतातील विविध प्रांतातील प्रांतीय स्पर्धेचे विजेते असल्याने सर्वचजण उत्तम प्रतीचे गायक होते व त्यामुळेच या ११ स्पर्धकांमध्ये चुरस तितकीच रंगणार होती. स्पर्धकांना साथ देण्यास हार्मोनिअमवर श्री. श्रीराम दातीर व तबल्यावर श्री. अमीत खेर होते.

**स्पर्धकांची ओळख पुढीलप्रमाणे :**

१) प्राजक्ता पालोरकर – अहमदाबाद ८
२) अमेय फडके – हैद्राबाद ९
३) पारुल वैद्य  अजमेर – १०
४) सुप्रिया कापसे – भोपाळ ११
५) भूषण करकरे – झांशी
६) केतकी गोडबोले – बडोदे
७) धनश्री लिमये – ग्वालियर
८) ऋतुजा जोशी – बेळगाव
९) सोमेंद्र फडके – भिलाई
१०) पूर्णेश भागवत – वाराणसी
११) अमित आळेकर – इन्दौर

प्रत्येक स्पर्धकास १) नाट्यगीत / उपशास्त्रीय २) भावगीत ३) लोकगीत या सदरात प्रत्येकी एक-एक असे गाणे गायचे होते. त्यानंतर परीक्षकांच्या पसंतीचे एक अशी एकूण ४ गाणी १५ मिनिटांत गायची होती.

प्राजक्ता पालोरकरच्या सुरेल आवाजात स्पर्धेस सुरूवात झाली. पाठोपाठ एक एक सर्व गायक आपापली गाणी सादर करत होते. सर्व उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन गाणी ऐकत होते. प्रत्येक स्पर्धक इतके अप्रतिम गात होते की ती एक स्पर्धा नसून एक उत्कृष्ट संगीत मैफिलच वाटत होती. उत्तरोत्तर रंगणाऱ्या या कार्यक्रमात बेळगावच्या ऋतुजा जोशी हिने तर प्रेक्षकांना एका वेगळ्याच विश्वात गेल्यासारखी अनुभूती करवली. तिने गायलेले 'जोहार मायबाप जोहार' तर असे वाटत होते की तिने न थांबता गात रहावे व आपण डोळे बंद करून निव्वळ त्या स्वर्गीय अशा गाण्यात डुबून जावे. खरोखर त्या सर्व उमलत्या गायकांचे कसलेले आवाज ऐकण्याचे सद्भाग्य बडोदेकरांना प्राप्त करून देण्याचे खूप मोठे कार्य कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे यांनी केले.

सर्व गायकांची गाणी झाल्यावर राजमाता श्रीमंत शुभांगिनीराजे गायकवाड, संघाचे अध्यक्ष व बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सर्व पदाधिकारी व्यासपीठावर स्थानापन्न झाले. यानंतर कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे यांचे मुखपत्र 'दिवाकर'चा 'बडोद्याचा सांगितीक वारसा' या विषयावरील असलेल्या विशेषांकाचे राजमाता शुभांगिनीराजे यांच्या शुभहस्ते विमोचन करण्यात आले. राजमाता शुभांगिनीराजे यांनी आपल्या मनोगतात स्पर्धकांचे तोंड भरून कौतुक केले व त्यांना शुभाशिर्वाद दिले. यानंतर स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. प्रथम क्रमांक ऋतुजा जोशी, द्वितीय धनश्री लिमये व तृतीय क्रमांक अमित आळेकर व केतकी गोडबोले यांत विभागला गेला.

सर्व स्पर्धकांना राजमातांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व बक्षीस दिले गेले. यानंतर सर्वांसाठी कऱ्हाडे ब्राह्मण संघाने प्रीतीभोजनाचीही उत्तम सोय केली होती. अखेरीस ३० तारखेला सुरू केलेला हा द्विदिवसीय संगीत सोहळा उत्तम रीतीने संपन्न झाला. खरोखर हा कार्यक्रम म्हणजे कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे यांच्या कारकिर्दीतला एक मानाचा तुरा म्हणले तर काही वावगे नाही.

**डोळ्यामधून अश्रू ओघळला**
**की तोही आपला रहात नाही**
**वाईट मात्र याचच वाटत की**
**दु:ख त्याच्या सोबत वाहत नाही**

**गावातले सगळे रस्ते**
**रात्री गावाबाहेर पडतात**
**मला घरी परतायच असतं**
**पण ते मला रानात नेऊन सोडतात**

**मनामध्ये असू द्यावा**
**एक आठवणींचा कप्पा**
**म्हणजे हव तेव्हा मारता येतात**
**दूर गेलेल्यांशी गप्पा**

**पावसावरच्या निबंधाला**
**कधीच पूर्ण मार्क मिळत नाहीत**
**कारण मार्क देणारा आणि घेणारा**
**दोघांनाही तो कळत नाही.**

**– अनामिका**

WITH BEST COMPLIMENTS FROM

# J.P.F. Metacast Private Limited

Plot No. 7,16 & 32, S.No. 589 & 607, Machhe industrial Estate,
Belgaum 590014. Phone : 0831-2440664,
Fax: 0831-2441069 E-mail : admin@jpfmetacast.com,
Website : www.jpfmetacast.com

- 1st ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007
- Winner of Jayaswal Neco Quality Award 2012
- Manufacturers of CI & S G I, machined & unmachined Castings.
- ISO 9001:2008 COMPANY
- Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Componant & Intricate Castings, Cylinder Heads.

## SDS ENTERPRISES



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?



आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.

**Sales**
- Desktop
  a. Branded
  b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  a. Desktop
  b. Laptops
  c. Network
  d. Printers

**संपर्क**
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net


# आमची अंदमान सहल नव्हे, ही तर क्रांतीधामची यात्रा



अंदमानातील सेल्युलर जेल (आराखडा)

शिवसंघ प्रतिष्ठानच्या तर्फे अंदमानची सहल नेहमीच आयोजित केली जाते. अंदमान येथे नेण्याचा संकल्प केला आहे. ज्या योध्याने आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य मिळावे म्हणून अपार कष्ट घेतले, आपले संपूर्ण आयुष्य वेचले त्याच्या प्रती आदर, कृतज्ञता व्यक्ती करण्यासाठी या सहलीचे आयोजन केले जाते. शिवसंघ प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी एक लाख सावरकर भक्तांना पण माझ्या मते ही वास्तू जेल नसून ती जाज्वल्य अशी स्मृती आहे आणि हे अंदमान जेल नसून क्रांतीधाम आहे हे असे मला वाटते म्हणूनच आम्ही या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्याच्या हेतूने या चमूत सहभागी झालो. अंदमान म्हणजे काळेपाणी असे का म्हटले जाते याबाबत सर्व प्रथम अंदमानची माहिती आणि सभोवतालचा परिसर याची माहिती घेणे अत्यावश्यक ठरते. अंदमान आणि निकोबार हा बेटांचा समूह आहे असे म्हटले जाते. इतिहास संशोधकांनी याबाबत दिलेली माहिती म्हणजे अशी की हा बेटांचा समूह म्हणजे हिमालय पर्वताचा एक भाग असून त्याला आरकांयोमा असे संबोधले जाते. अंदमान आणि निकोबार बेटांचा समूह ५५६ लहान मोठ्या बेटांनी मिळून झालेला आहे आणि त्याचे क्षेत्रफळ उत्तर पूर्व ते दक्षिण पूर्व असे ८२५० वर्ग किलोमीटरएवढे आहे. या द्वीप समूहाला निसर्गाची देणगीच आहे कारण की येथील समुद्रकिनारे निळ्याशार पाण्यानी युक्त आहेत व प्रदूषणापासून मुक्त आहेत. निर्मल आणि स्वच्छ असे पाणी असल्यामुळे कोरल्स पाहण्याचा आनंद मिळतो. इंग्रजी राजवटीत आर्चिबाल्ड ब्लेयर आणि कोल्ब्रूक या दोन अधिकाऱ्यांनी या बेटांचा अभ्यास करून एक रिपोर्ट सादर केला त्यावर विचार करून या बेटांवर वस्ती होऊ शकते असे इंग्रजांच्या मनात आले आणि त्यांनी कैदी लोकांची पहिली तुकडी सन १७८९ मध्ये पाठवली तेथे या कैद्यांचे अतोनात हाल करत असत आणि त्याचेवर अत्याचार करत असत यामध्ये कैद्यांचे प्राण जात असत. तर कुणाला फाशी दिली जात असे. अशा प्रकारची काळी कृत्ये इंग्रजांनी केली. त्यामुळे हा बेटांचा समूह काळेपाणी म्हणून प्रसिद्ध झाले. आर्चिबाल्ड ब्लेयर याच्या नावावरून या बेटास पोर्ट–ब्लेयर असे संबोधले जाऊ लागले.

अंदमानमध्ये काय पाहाल : राष्ट्रीय स्मारक सेल्युलर जेल, एकूण ७ बिल्डींग परंतु प्रत्येक बिल्डींगला एक जाळीदार लोखंडी दार आहे आणि प्रत्येक कोठडीला दोन प्रकारची कुलुपाची व्यवस्था आहे. या जेलची व्यवस्था अशी केली आहे की एक कैदी दुसऱ्या कैद्याशी सम्पर्क साधू शकत नाही. एका कोठडीचा दरवाजा हा दुसऱ्या कोठडीच्या मागे पडतो. त्यामुळे कैदी एकाकी पडत असत. स्वातंत्र्यवीर सावरकरांना या जेलमधील सातव्या बिल्डींगमधील तिसऱ्या मजल्यावरील शेवटच्या खोलीत बंदी केले होते. या खोलीमध्ये अत्यंत कमी उजेड आणि हवा यावी यासाठी ७ फुटावर प्रकाशादन ठेवले आहे. पण याचा काहीही उपयोग होत नाही कारण येथे सतत ११ महिने पाऊस आणि आकाश नेहमी ढगांनी पूर्ण भरलेले असते. प्रत्येक कोठडीला समोर संपूर्ण जाळी बसवलेली आहे. स्वतंत्र्यवीरांच्या कोठडीला याहीपेक्षा अधिक सुरक्षा आहे. समोर एक दरवाजा आणि त्यापुढे एक अजून लोखंडी दरवाजा एवढी सुरक्षा असल्यामुळेच याला सेल्युलर जेल असे म्हटले जाते. ज्यावेळी एखाद्या कैद्याला फाशी द्यावयाची असे त्यावेळी सावरकरांना कोठडीमधून बाहेर आणले जाई आणि त्यांच्यासमोर त्या कैद्यावर अत्याचार करून त्याला फाशी दिली जाई. तसेच अनेक कैद्यावर कोरडे ओढणे, जड अशा दगडाच्या तेल घाणी–वर जुंपून त्यांना कामास लावणे आणि जर थांबले तर त्यांना चाबुकाने मारणे, इत्यादी शिक्षा देताना सावरकरांवर आणि अन्य कैद्यांवर जरब बसवण्यासाठी त्यांच्यासमोर त्या केल्या जात. सेल्युलर जेलवर नजर ठेवण्यासाठी मुख्य टॉवर वर एक पहारेकरी असे त्याला त्या टॉवरवरून सर्व सातही बराकीवर लक्ष ठेवता येत असे.



लेखक – सौ. शुभदा गुर्जर, पुणे


नम्रता ही शिक्षणाची पहिली पायरी आहे.

संस्थावृत्त

# महासंघाची अर्धवार्षिक सभा संपन्न:




दि. २३ फेब्रुवारी २०१४ रोजी मुंबई येथे महासंघाची अर्धवार्षिक सभा कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुंबई यांनी अत्यंत उत्तम आणि शानदार पध्दतीने आयोजित करून सर्वाना शानदार आयोजनाचा धडा घालून दिला.

सभेचे अध्यक्षस्थान श्री. आनंद पराडकर (नागपूर) यांनी स्विकारले. सुरूवातीला श्रीगणेशाचे पूजन करून आणि दीपप्रज्वलनाचा करून सभेचे कामकाजास सुरूवात झाली. नेहमीच्या पध्दतीनुसार कामकाज सुरू झाले.

श्री. गोपाळ भाटवडेकर कार्यवाह यांनी मागील सभेचा वृतांत वाचून दाखवला; आणि सभेने त्यास एकमताने मंजूरी दिली. त्यानंतर कोषाध्यक्ष श्री. सी.पी.जोशी (बेळगांव) हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपस्थित नव्हते त्या ऐवजी श्री. गणेश गुर्जर संपादक संपर्क यांनी वर्ष २०१२–२०१३चा ताळेबंद आणि आयव्यय पत्रक वाचून दाखवले आणि चर्चेसाठी सभेपुढे सादर केले. ह्यावर उपस्थित सदस्यांनी चर्चेत भाग घेतला आणि आपली मते परखडपणे मांडली. श्री. देवभक्त (बडोदा) यांनी संघाचे रजिस्ट्रशेन आणि पॅनकार्ड असावे असे सुचविले तर मी अभय आठल्ये (ठाणे) यांनी संघाची वेबसाईट असावी आणि त्यासाठी खर्चाची तरतूद करावी असे सुचवले. त्यासाठी १० ते १५,००० हजार रूपयांची तरतूद करावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले. श्री. अरविंद भाटवडेकर (अध्यक्ष) मुंबई संघ यांनी अद्ययावत माहिती असावी असे प्रतिपादन केले, अशाप्रकारे संघाची वेबसाईटसाठी आणि रजिस्ट्रेशन पॅनकार्ड साठी तरतूद करण्याचे श्री. गणेश गुर्जर यांनी मान्य केले.

यानंतर श्री. गणेश गुर्जर यांनी संपर्क या आपल्या त्रैमासिकाच्या प्रगतीचा आढावा घेतला व वार्षिक वर्गणी रू. १०० वरून रू. १२० करावी असे सुचवले. तसेच प्रत्येक संघाने आपल्या संघातील सभासदांशी संपर्क साधून वर्गणीदार वाढवावेत असे प्रयत्न करण्याचे आवाहन केले. श्री. अविनाश मंडपे (अध्यक्ष) मुलुंड यांनी चर्चेत भाग घेतांना असे सांगितले की व्यावसाईकांची संदर्भ यादी बनवावी तर श्रीमती माधुरी शेंबेकर यांनी प्रत्येक संघाने वधुवर मंडळातील सभासदांची नावे व अन्य माहिती संपर्क मध्ये प्रसिध्द करावी सूचना केली.

श्री. गणेश गुर्जर यांनी वर्ष २०१४–२०१५ साठी प्रिंटर्सकडून आलेल्या निविदांची माहिती दिली व नवीन प्रिंटर्स नेमण्याची मंजूरी द्यावी असे सूचीत केले. त्यावर सभेने श्री. गणेश गुर्जर संपादक यांना नवीन प्रिंटर निवडण्याचे सर्वाधिकार दिले. त्याचप्रमाणे मसंपर्कफ्च्या अंकाची ई–एडीशन काढता येईल का? ह्यावर चर्चा झाली व जाहिराती सोडून बाकीचा मजकूर पीडीएफ फाईलमधून पाठवावा असे ठरवण्यांत आले.त्यासाठी वर्ष १३–१४ च्या अंकापासून सुरूवात करावी व ते कितपत यशस्वी होते ते पहावे असे ठरले.

यानंतर महासंघाची घटना या विषयावर चर्चा झाली श्री. अविनाश मंडपे यांनी महासंघाच्या घटनेचा अंतिम मसुदा सादर केला व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. पहिल्या सत्रानंतर भोजनासाठी सुट्टी घेण्यांत आली.

दुसऱ्या सत्रांत प्रत्येक संघाच्या प्रतिनिधींनी आपापल्या संघाच्या निरनिराळ्या कार्यक्रमांचा आढावा घेतला यामध्ये श्रीमती माधुरी शेबेंकर (मुलुंड), श्री.सुरेश जठार(नाशिक), श्री देवभक्त (बडोदा), श्री.श्रीकांत हर्डीकर (डोंबीवली), श्री गणेश गुर्जर (पुणे)यांनी आपआपल्या संघात होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली.यामुळे अन्य संघानाही प्रेरणा मिळेल अशी अशा आहे.

श्री. अरविंद भाटवडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि त्यानंतर अध्यक्ष श्री. आनंद पराडकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले व नंतर सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

उपस्थित सर्व सदस्यांनी आजच्या सभेच्या उत्तम आयोजननाबाबत कौतुक केले आणि संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना धन्यवाद दिले.

**– श्री. गोपाळ भाटवडेकर**
**कार्यवाह महासंघ**



काव्य हे फेसाप्रमाणे नवे व खडकाप्रमाणे जुने असावे.

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली (जि. ठाणे) येथे संक्रांत संमेलन संपन्न

संस्थावृत्त

सालाबादप्रमाणे संक्रांत संमेलन रविवार दि. १२ जानेवारी २०१४ रोजी संस्थेच्या समाजमंदिर सभागृहात संपन्न झाले. सायं. ४ वा. पासून कार्यक्रमाला सुरूवात झाली. या वर्षी १२ जानेवारी २०१४ रोजी ''स्वामी विवेकानंद सार्थ शती'' समारोह सांगता दिन असल्यामुळे त्याचे औचित्य साधून या दिवशी संक्रांत संमेलनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डोंबिवलीतील ज्येष्ठ समाजसेवक श्री. विष्णु गजानन देवस्थळी हे लाभले होते. तसेच सत्कार मूर्ती म्हणून ज्येष्ठ जादुगार व शब्द भ्रमकार श्री. कृष्णाजी श्रीराम गोडे व ज्येष्ठ समाजसेवक आणि सत्कर्म श्रद्धाश्रम संस्थेचे संस्थापक श्री. मोहन विष्णू बापट उपस्थित होते. तसेच विशेष अतिथी म्हणून मा. आमदार श्री. रविंद्रजी चव्हाण, त्याचप्रमाणे गोव्याचे घनपाठी वे.मू. श्री.योगेश्वर मनोहर बोरकर गुरुजी हे ही उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्वागत गीताने सुरुवात झाली. संस्थेच अध्यक्ष डॉ. श्री. अरुण अ. नाटेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ, पुष्प–गुच्छ व स्मृती चिन्ह देऊन स्वागत केले. त्यानंतर संस्थेचे सरकार्यवाह श्री. सुहास म. पंडित यांनी प्रास्ताविक केले.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमुख सत्कार मूर्तीचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्मृती चिन्ह व मानपत्र देऊन सत्कार केला. सूत्रसंचालन सौ. माधुरी येल्लापुरकर यांनी मान्यवरांच्या परिचय करून दिला. मा. आमदारांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. अरूण अ. नाटेकर यांनी केले. त्याचप्रमाणे वे.मू.श्री. योगेश्वर म.बोरकर गुरुजी यांचेही स्वागत अध्यक्षांनी केले. त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व मानपत्र देण्यात आले.

स्थानिक मान्यवर ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री. श्रीधर द. मोघे, दधिची देहदान मंडळाचे संस्थापक श्री. गुरुदास रा. तांबे, स्वामी विवेकानंद सेवा मंडळाचे अध्यक्ष श्री. केतन रा. बोंद्रे यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृती चिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

विद्यार्थी गुणगौरव, प्रमुख पाहुण्यांचे मनोगत, प्रमुख सत्कारमूर्तीचे मनोगत, तसेच मा. आमदारांचे मनोगत झाले. संस्थेच्या संकेत स्थळाचे उद्घाटन व संस्थेच्या माहिती पत्रिकेचे प्रकाशन मा. आमदार श्री. रविंद्रजी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी मा. अध्यक्ष डॉ. श्री. अरुण अ. नाटेकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले. आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. माधुरी येल्लापुरकर यांनी तर आभार प्रदर्शन सौ. अनुश्री अ. नाफडे यांनी केले.

मध्यांतरामध्ये कॉफी–पान झाल्यावर कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्राला सुरूवात झाली. प्रसिद्ध वक्ते श्री. विवेक घळसासी यांचे 'स्वामी विवेकानंद जीवन दर्शन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

संक्रांत संमेलनाला संस्थेची दोन्ही सभागृहे सभासदांनी भरगच्च भरली होती. संपूर्ण कार्यक्रमाला सर्व सभासद कुटुंबीयांनी मनमुराद दाद दिली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. नंतर प्रिती भोजनाने कार्यक्रम समाप्त झाला. डोंबिवली पूर्व नगर कार्यकारिणी व महिला नगर कार्यकारिणी यांच्या विशेष परिश्रमामुळे कार्यक्रम उठावदार व यशस्वी झाला. संस्थेचे सांस्कृतिक समिती प्रमुख श्री. केदार सु. पाध्ये यांनी कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी घेतली होती. या वर्षीचा उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून पूर्व नगर कार्यकारिणीचे कार्यवाह श्री. मिलिंद मा. काळे यांचा गौरव करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कार्यकारिणी म्हणून शिक्षण समितीची निवड करण्यात आली.

**कार्यवाह – श्री. प्रदीप श्री. हळबे**

---

**पान क्र. २९ वरून**

## आमची अंदमान सहल नव्हे, ही तर क्रांतीधामची यात्रा

अशा या सेल्युलर जेलचे दर्शन घेवून आम्ही पवित्र झालो. या कोठडीमध्ये सावरकरांचा फोटो ठेवला आहे आणि त्यांच्या बंधू बाबाराव सावरकरांनी लिहिलेले काव्य लावलेलं आहे. आम्ही सर्वांनी त्या पवित्र वास्तुमध्ये ''सागरा प्राण तळमळला'' हे गीत म्हटले. त्यानंतर साउंड आणि लाईट हा कार्यक्रम की जो केंद्रीय सरकार आणि सावरकर स्मारक समितीद्वारा तयार केला असून सेल्युलर जेलच्या निर्मितीपासूनची माहिती व ब्रिटीश सरकारकडून राजकीय आणि अन्य कैद्यावर झालेल्या अत्याचारावर आधारित असून ती पाहताना अक्षरश: अंगार काटा उभा राहतो व रडू कोसळते. अंदमानला जाण्यासाठी केवळ दोनच मार्ग आहेत. एक बोटीतून आणि दुसरा विमानातून, विमानातून जाणे म्हणजे निळ्याशार समुद्राचे दर्शन होते. बोटीने जाण्याने वेळ लागतो. आम्ही विमानाने प्रवास केला. विमानतळावर उतरल्यानंतर खूपच आनंद झाला. श्री बबन फाले की जे अंदमान निकोबा बेटावर २९ वर्ष शिक्षण खात्यामध्ये नोकरी करत असताना त्यांनी सावरकरांवरील प्रेम आणि आदरापोटी खूपच कार्य केले आहे त्यांनी अथक प्रयत्नातून महाराष्ट्र मंडळाची स्थापना केली आणि सेल्युलर जेल समोरील सावरकर उद्यान ही त्यांच्या प्रयत्नांनी साकार झालेले आहे. अंदमान मधील विमानतळाला ''वीर सावरकर विमानतळ'' हे नाव देण्याच्या त्यांच्या प्रयत्नही यशस्वी झाला आहे. यानंतर आम्ही अंदमान मधील काही बेटे पाहणार होतो, परंतु २६ जानेवारी २०१४ रोजी बोटीचा मोठा अपघात झाल्यामुळे आम्हास नील, रॉस, माया बंदर पाहता आले नाही, पण हॅव लॉक बेटाला भेट दिली. मड बोलकानो, बाराटांग बेट, वगैरे ठिकाणांना भेट दिली. अंदमानला भेट देण्यामागचा आमचा उद्देश या यात्रेमुळे सफल झाला आणि आम्ही स्वातंत्र्यवीर सावरकरांना अगदी मन:पूर्वक अभिवादन केले.


कवी म्हणजे आत्म्याचे चित्र रेखाटणारा चित्रकार.

# ‘स्त्रीभ्रूणहत्या’ एक सामाजिक आव्हान



’स्त्रीभ्रूणहत्या’ या शब्दातच क्रूरता सामावलेली आहे. समाजाला लागलेली ही कीड आहे. त्याचं मुळापासूनच उच्चाटन व्हायला हवे, स्त्री ही या जगाची स्वामीनी आहे. आज पुरुषांच्या बरोबरीने ती काम करू लागली आहे. घरात, बाहेर आपले कर्तृत्व ती सिद्ध करून दाखवणारी आहे. स्त्री नसेल तर घराला घरपण येत नाही. तसेच ती अन्य क्षेत्रातही प्रगती करत आहे. जवळ जवळ सर्व क्षेत्रांत तिने बाजी मारली आहे. ऐतिहासिक, शैक्षणिक, राजकारण, सामाजिक, वैद्यकीय, संगीत, नाट्य, कला, वैज्ञानिक, खेळ, अशा आणि अनेक क्षेत्रांत नैपुण्य मिळालेल्या स्त्रियांची संख्या खूपच आहे. तेव्हां स्त्रीच नसेल तर पुढे काय हा विचार कोणी केलाय का? तुमचं अस्तित्व असतं तेही एका स्त्री मुळेच ना? नारी जन्मयते (प्रसवते) नरं.

स्त्रीमध्ये मुळातच सामाजिक जाणीव असते. समाजांत काही प्रामाणिक माणसे असतात, ती समाजाचे भूषण असतात आणि म्हणूनच जगाची प्रगती होत असते. त्यांत प्रामुख्याने स्त्रीचाच वाटा जास्त असतो. भारतीय परंपरा जपण्यांत स्त्रीचा सर्वाधिक भाग असतो. आपली भारतीय संस्कृती जगातल्या कुठल्याही संस्कृतीपेक्षा वाखाणण्यासारखी आहे. सण, उत्सव, समारंभ यातूनच आपल्या भारतीय संस्कृतीची परंपरा जपली जाते आणि त्यातूनच येणाऱ्या पिढीत कौटुंबिक प्रेम, सामाजिक बांधिलकी, देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा रुजवली जाते. परंतु कांही स्त्रीया या अंधश्रद्धेच्या वाटेवर चालणाऱ्या असतात. वंशाला दिवा पाहिजे या अट्टाहासापायी कोवळ्या कळीला उमलण्या आधीच खुडून टाकतात. त्यांनी त्यावर विश्वास न ठेवता जुन्या नव्याचा मेळ घालून सुवर्णमध्य साधला पाहिजे. समाजामध्ये वावरतांना स्त्रीला सुरक्षीत वाटायला हवे. आज आपण पहातो समाजामध्ये बलात्कार, खून, इतरमार्गास लावणे असे प्रकार स्त्रीयांबाबत होतात. तेव्हां त्यासाठी स्त्रीयांनीच एकत्र येऊन त्या विरुद्ध लढा दिला पाहिजे. स्त्री ही संकटांना तोंड देणारी रागरागिणी आहे. वेळ प्रसंगी ती चंडिकेचे रुपही धारण करणारी आहे. समाज कंटकांसाठी शिक्षा ही कठोर असायला हवी. कडक कायदा झाला पाहिजे. स्त्रीगर्भजल परीक्षा बंदीचा कायदा करूनही, पैशासाठी छुपे काम करणाऱ्यांवर आणि करून घेणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. वंशाला दिवा हवाच या अंधविश्वाला खत पाणी घालू नये. मुलगीही घराचे नाव उज्वल करते, मग हा मुलाचा अट्टाहास कशासाठी?

एकविसाव्या शतकांत स्त्री गर्भजल परीक्षा आणि त्यातूनच स्त्रीभ्रूणहत्येची समस्या निर्माण होत आहे. त्याला कठोर विरोध हा झालाच पाहिजे. समाजाला लागलेली ही कीड एक दिवस नक्कीच समूळ नष्ट होईल तो सोन्याचा दिवस. तेव्हांच खऱ्या अर्थाने माझ्यातल्या स्त्रीचा विजय होईल.

**– सौ. अनिता अरविंद फणसळकर**
निसर्ग फेज २,
अे – ११ वाकड, पुणे –५७
भ्रमणध्वनी – ८९७५१५५६७५

**(पान क्र. ३२ वरून)**

## मध्यमवर्गीयांचे नायक – व. पु. काळे

झालेल्या विश्वसाहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी नाटके लिहिली, पण यात ते रमले नाहीत. ‘पार्टनर’ ही त्यांची जबरदस्त कादंबरी. ह्याच नाट्यरूपांतर यशस्वी झालं नाही. १०० प्रयोग झाल्यावर हे नाटक बंद पडलं. या कादंबरीवर दुरदर्शन मालिका पण निघाली. ही मालिका पण गाजली नाही.

व.पुं. च्या प्रत्येक कथेला व.पु. टच असतो. त्यांच्या बहूसंख्य कथा या नोकरदार वर्गावर आहेत. त्यांचे नोकरीचे ठिकाण, त्यांचे वर्णन, ऑफिस मधल्या सहकाऱ्यांचे वर्णन, व्यक्ती व्यक्ती मधील बारकावे, त्यांचे वागणे या सगळ्याचे वर्णन व.पु. करतात त्याला तोड नाही. त्यांना हे सुचत कसं हे पाहून आश्चर्य वाटते. परत प्रत्येक कथेत जीवनाबद्दल एकदोन वाक्यात तत्वज्ञान आहेच. ‘कर्मचारी सातवळेकर’ या कथेत ते म्हणतात, ‘‘माणूस ही चीज मुळातच मला इंटरेस्टिंग वाटते. फार कुतूहलजनक, फार विविध आणि आदरणीय त्यात नवा माणूस, नवी ओळख म्हणजे पर्वणीच.’’ सातवळेकरच वर्णन व.पुं.नी अफलातून केलं आहे व शेवटी जीवन म्हणजे सहन करणे हा संदेश दिला आहे. पहिली मुलगी झाली म्हणून आनंदाने पेढे वाटणारा देवस्थळी, भांडणाचे क्लास काढणारा जोशी, Every person is a pattern and don't change your pattern हे सांगणारा मनस्वी खांबोरे, आपल्या नवऱ्याची उध्वस्त झालेली स्वप्ने अनुभवणारी कल्पना, स्वत:च्या एकुलत्या एक मुलाचे अनेक मृत्यु पाहणारे कारखानीस यांची व्यक्तीचित्रणे मनात कायमची रेंगाळत राहतात.


आयुष्याच्या उत्तरार्धात ते ओशोमय झाले. या जन्मावर या मरणावर शतदा प्रेम करावे या वृत्तीचे ते होते. त्यांनी मृत्युवर फारस लिखाण केल नाही. आयुष्यात संवादावर भर देणाऱ्या व.पुं.नी प्रौढत्वात लवकरच मृत्युशी संवाद साधला व जीवनाच्या रंगमंचावरच अकाली एक्झिट घेतली.

– दीपक दीक्षित
कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बेळगांव

 उंबऱ्यातील ईश्वरता आहे, कर्मशून्यतेत किंवा विध्वंसकतेत नाही.

# आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ 'कऱ्हाडे' व्यक्तिमत्वे

पद्मभूषण




डॉ. जयंत नारळीकर

पद्मश्री



डॉ. वसंतराव गोवारीकर



डॉ. प्रमोद पी. मोघे



डॉ. आनंदवर्धन हर्डीकर

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

CARING since 1947 A Vasan Healthcare Enterprise

# जागतिक दर्जाची नेत्रसेवा आता पुण्यामध्ये



नेत्र उपचारांमध्ये
सर्व काही
एकाच ठिकाणी

सल्ला
निदान
उपचार
शस्त्रक्रिया

मोतिबिंदू बिनटाक्यांची आधुनिक शस्त्रक्रिया * मधुमेहामुळे होणारे डोळ्यांचे आजार * लेझर शस्त्रक्रिया * लहान मुलांचे दृष्टीदोष, तिरळेपणा व शस्त्रक्रिया * ग्लुकोमा किंवा काचबिंदू-उपचार व शस्त्रक्रिया * कॉन्टॅक्ट लेन्स व चष्म्याविषयी शास्त्रीय उपचार * अनेकविध गुंतागुंतीच्या नेत्ररोगावरील उपचार

vasan eye care Hospital
ENHANCING VISION
CGHS मान्यताप्राप्त

१७५ हून अधिक रूग्णालय
१००० हून अधिक निष्ठावान नेत्रचिकित्सातज्ञ
१०००० हून अधिक प्रशिक्षित कर्मचारी वर्ग

• करीश्मा सोसायटीजवळ, सिध्दार्थ टॉवर्स समोर, कोथरूड, पुणे ३८. फोन : ०२०-३९८९००००
• ॲमनोरा मॉल शेजारी, मगरपट्टा सिटी समोर, खराडी-हडपसर लिंक रोड, हडपसर, पुणे. फोन : ०२०-३९८९०३००
लवकरच सदाशिव पेठ आणि सेनापती बापट रोड येथे...

BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषकः
संपादक - भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३०

To,